संत निरंकारी

मूल्य १०/-रु.

वर्ष १७ वे अंक २ रा मराठी फेब्रुवारी २०११



भक्तीपर्व समागमातील
शोभायात्रेत विराजमान
सद्गुरु बाबाजी,
निरंकारी राजमाताजी व
पूज्य माताजी

भक्तीपर्व समागमातील
काही वक्तागण -
डॉ. जगन्नाथ शर्मा 'हंस'
गुरप्रीत अरनेजा,
बलदेव नारंग,
चन्नी फरीदाबादी,
सेवासिंह बुट्टर व
ओमप्रकाश 'ओमी'

विद्वान विचारवंत व
कवी विवेक 'शौक'
यांच्या श्रद्धांजली समारोहात
सद्गुरु बाबाजी व
पूज्य माताजींचा आशीर्वाद
घेताना विवेकजींची मुलं

संत निरंकारी

(संत निरंकारी मंडळाचे ध्येय व कार्य आणि संत महापुरुषांची शिकवण देणारे भक्तिमार्गदर्शनपर मराठी नियतकालिक)

वर्ष १७वे | अंक २ रा | फेब्रुवारी २०११ | पाने - ४०

❖ संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव ❖ सहसंपादक - श्री. जगन्नाथ चैतन्य मडकर

अनुक्रमणिका

संपादकीय	संपादक	.....	२
श्रीगुरुवचनामृत	श्रीसद्गुरुदेव	.....	१७
म्हणे अवतार	श्री. स. वि. लव्हटे	.....	३
सेवा-गुरुभक्तीचं एक अंग.....	श्री. चंद्रकांत व पांडुरंग अवसरे	.....	५
सेवा-निष्काम निरिच्छित असावी	सौ. विजयमाला पवार	.....	८
सेवा-सुखांची खाण	श्री. जगन्नाथ होडशिळ	.....	१०
सेवेचं महात्म्य निरंकारी विचारधारेतून	कु. वंदना दाभोळकर	.....	१२
सेवा-सुखांची खाण	श्री. नरेंद्र ग. पाटील	.....	१३
सेवा-निष्काम निरिच्छित असावी	श्री. गणेश घरत	.....	१५
अहंकाराचा रोग (अनुभवाचे बोल)	श्री. विकास अरोरा	.....	१६
जीवन संजीवनी... अमृत फळ (आवळा)	-	.....	२३
सद्गुरु सारीखा असता पाठीराखा	श्री. हनुमंत बोराटे	.....	२५
सेवा-गुरुभक्तीचं एक अंग.....	श्री. रविंद्र पेरवे	.....	२६
प्रत्येक सेवा महान आहे	श्री. सिताराम कोळेकर	.....	२८
साधु जनांची सेवा करणे	श्री. मोहन थोरबोले	.....	२९
गुरुभक्तांचा सेवा भाव	कु. रुपेश सावंत	.....	३१
सेवा-सद्गुरुचे एक बरदान....	श्री. युवराज सूर्यवंशी	.....	३३
सेवा-सद्गुरुचे भक्तांसाठी एक बरदान	कु. मीरा चव्हाण	.....	३५
सेवेने चारित्र्यमय जीवन बनते	श्री. शंकर घाणेकर	.....	३७
सेवा-सद्गुरुचं एक बरदान.....	श्री. शंकरराव बारसे	.....	३८
सेवा-श्रध्दा, प्रेम, नम्रतेने व्हावी	श्री. सुनील नांदोडे	.....	४०

गीत/कविता

सद्गुरुचे सेवक	श्री. गणपत नेमन	.....	७
गुरुपूजा	कु. सोनाली चव्हाण	.....	३९

लेखकाच्या विचारांशी संपादक सहमत असणे अनिवार्य नाही.

वर्गणी	वार्षिक	आजीवन
भारत	₹ ८०/-	₹ ८००/-
इंग्लंड	£ 12	£ 150
युरोप	€ 15	€ 200
अमेरिका	$ 20	$ 250
कॅनडा	$ 25	$ 300

प्रति अंक रु. १०/-

कार्यालय/पत्रव्यवहार पत्ता
पत्रिका विभाग,
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, मुं - १४.
फोन : २४१० ५७ ४९
इंटरनेट: http://www.nirankari.org
ई-मेल: marathi@nirankari.org

मालक : संत निरंकारी मंडळ
संत निरंकारी सत्संग भवन,
माहूल रोड, चेंबूर, मुंबई - ४०० ०७४.
दूरध्वनी : २५५३ १४ ६८

Member of All India Small and Medium Newspapers Association and Indian Languages Newspapers Association

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक आणि प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी हे मासिक प्रॉस्पेक्ट प्रिंटींग प्रेस, कुलकर्णी कॉटेज, गोखले कॉस रोड, दादर, मुंबई - ४०० ०२८, येथे छापून संत निरंकारी सत्संग भवन, ५०, मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४ येथे प्रकाशित केले.

संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव

संपादकीय

भगवान शिव शंकराने माता पार्वतीला कथन केलेल्या गुरु गीतेमध्ये सामान्य गुरु विषयी आणि गुरुविषयी प्रतिपादन करताना सांगितले गेले आहे की,

गुरवो बहवः सन्ति शिष्यवित्तापहारकाः।
तमेकं दुर्लभं मन्ये शिष्यहृत्तापहारकम्।।

की, शिष्याच्या धनाचं हरण करणारे गुरु तर खूप आहेत, परंतु शिष्याच्या हृदयाचा ताप हरण करणारा गुरु दुर्लभ आहे. वास्तविक सदगुरु जो असतो त्याच्या मनात मानवमात्राला आकर्षित करण्याचा उद्देश नसतो, तर त्यांच्या कल्याणाची आणि उद्धाराची तळमळ असते. खरं पाहिलं तर ते कोणाला शिष्य बनवत नाहीत, टोळी बनवत नाहीत आणि कोणाकडून काही घेतही नाहीत, केवळ आपल्या मार्गावरुन चालणाऱ्या साधकांसाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवसमाजाच्या कल्याणासाठी ते प्रयत्नरत राहतात. या मायावी संसारातील सुख-दुःखाविषयी ते परिपूर्णपणे अवगत असल्याने या सांसारिक दुःखातून सर्वांनी मुक्त व्हावे हा त्यांचा प्रयत्न असतो.

वर्तमान समयाला सामान्य गुरुंचं अक्षरशः पेव फुटलं आहे. त्यामुळे वास्तविक सदगुरुला ओळखणं अध्यात्मामध्ये विश्वास ठेवणाऱ्या भोळया भाबड्या लोकांना कठीण होऊन बसलं आहे. अलिकडे तर गुरु बनणं हा एक मोठा व्यवसायच बनला आहे. स्वतःला गुरुरुपात प्रगट करुन ते आपली उपजीविका चालविण्यासाठी शिष्यपरिवार जमा करतात. आपला भौतिक स्वार्थ सिध्द करण्यासाठी आणि नावलौकिक करण्यासाठी त्यांचा आटापिटा चाललेला असतो. परिणामी या मार्गावरुन चालणाऱ्या त्यांच्या शिष्य परिवारामध्येही याच भावना रुजल्या जातात. स्पष्टवादी संत कबीरजींनी अशा परिस्थितीचं वर्णन करताना लिहिलं आहे की,

गुरु लोभी सिष लालची, दोनो खेले दाँव।
दोनो डूबा 'परसराम' बैंठ पथरकी नाँव।।

आजकाल बनावट (*Duplicate*) वस्तुंचं युग आहे. प्रत्येक गोष्टीत भेसळ आहे, बनावटपणा आहे. कमी अधिक फरकाने सर्वच क्षेत्रात याची जाणीव होत आहे. ब्रह्मचारी, ब्राह्मण, क्षत्रीय, वानप्रस्थ, साधू, इतकंच नाही तर फळं, फुलं, भाज्या, मिरची-मसाले, दैनंदिन जीवनातल्या वस्तूही बनावट, त्यातही भेसळ. आध्यात्मिक क्षेत्रातही तो बनावटपणा पहायला आणि अनुभवायला मिळतो आहे. अधिकाधिक शिष्य परिवार जमा करुन आपलं प्रस्थ कसं वाढेल याकडे लक्ष दिलं जातंय. स्वयंघोषित राजाप्रमाणे स्वतःला सदगुरु ही उपाधी लावली जात आहे. लोकांच्या भोळेपणाचा फायदा उठवून त्यांना वास्तविकतेपासून दूर नेलं जात आहे. खरं पाहिलं तर स्वतःला सोनार म्हणणाऱ्याकडे शुध्द सोन्याची जाण असायला हवी किंवा मग सोन्याचे दागिने बनविण्याची कला-कसब त्याच्याकडे असायला हवी, तरच त्याला सोनार म्हणवून घेण्याचा अधिकार आहे. स्वतःला ब्राह्मण म्हणविणाऱ्याकडे प्रत्यक्ष परब्रह्म परमात्म्याची अनुभूती हवी तरच तो ब्राह्मण होऊ शकतो. तद्वतच स्वतःला सदगुरु म्हणविणाऱ्याकडेही ब्रह्मानुभूती हवी आणि ती इतरांना करुन देण्याची क्षमता हवी. एक गोष्ट आणखी महत्वाची आहे की, जो वास्तविक सदगुरु असतो, ज्याच्यामध्ये ही लक्षणं असतात, तो स्वतःला कधी सदगुरु म्हणवून घेत नाही तर स्वतःला मानवमात्राचा दास समजतो. कोणाकडून कसलीही अपेक्षा न करता मानवमात्राच्या कल्याणासाठी आपलं तन-मन झिजवतो. ब्रह्मानुभूतीद्वारे मानवमात्राला प्रेमाचा, एकतेचा आणि मानवतेचा संदेश देतो.

सांप्रत समयाला प्रत्येकाने आपला विवेक जागृत करुन आध्यात्मिक क्षेत्रात पाऊल टाकण्याची आवश्यकता आहे.कारण खऱ्या वस्तू ऐवजी एखादी बनावट वस्तू किंवा सदगुरु ऐवजी एखाद्या सामान्य गुरुच्या विळख्यात आपण सापडून आपल्या बरोबरही धोका होऊ शकतो. म्हणून सर्वप्रथम धर्मग्रंथांमधून सदगुरुची लक्षणं जाणून घ्यावी व त्यानुसार त्या सदगुरुकडून आपल्याला ब्रह्मानुभूती होते का याची खातरजमा करुन घ्यावी. कारण ग्रंथप्रचिती, शास्त्रप्रचिती, आत्मप्रचिती व गुरुप्रचिती यांच्या अनुभूतीतून (ब्रह्म) शक्ती, भक्ती आणि मुक्तीचं दान देणाऱ्यालाच वास्तविक सदगुरु म्हणता येईल.

□ *चंद्रकांत जाधव*
snm.jadhavca@gmail.com

भाग-१८

॥ म्हणे अवतार... ॥

मूळ अवतारवाणी

भरपूर खलावां अन्दर वेखो पसरी बैठे जो दातार ।
वक्त दे हाकम ने है रखया नां एसे दा ही निरंकार ।
जो कुझ दिसदै नज़रीं आउंदै एसे दा है सगल पसार ।
दीन दुखी भगतां दा रखशक एहो सृष्टि सिरजनहार ।
एहो बेड़ी चप्पू एहो आप समुन्दर खेवनहार ।
बेद कतेबां दे नहीं वस दा बेअन्त एह बेशुमार ।
जाप ताप तों वस न होवे घालां दी न जकड़े तार ।
कहे अवतार मिले जे सत्गुर लाहे परदा छिन विचकार । (पद क्र.११)

मराठी अनुवाद

आकाशाच्या अतीपलीकडे आहे व्यापून जो दातार।
ठेवियले समयाच्या गुरुने नाव आज याचे निरंकार।
दृष्टीगोचर जितुके जगती सर्व पसारा असे याचा।
दीन दुःखी भक्तांचा रक्षक रचिता हाची जगताचा।
हाची नौका हा नावाडी हाची उतरी सागरपार।
वेद ग्रंथ वर्णीता थकले अफाट हा याचा विस्तार।
जपा तपाने वश ना होई व्रत कर्माहून दूर असे।
म्हणे अवतार की सद्गुरु मिळता क्षणात प्रभुचे रुप दिसे।। (पद क्र.११)

बाबा अवतारसिंहजींनी या पदामध्ये म्हटले आहे की, हा ईश्वर आकाश तत्वाच्या पलीकडे असून वर्तमान समयाच्या सद्गुरुने त्याचे नाव आता ''निरंकार'' असे ठेवले आहे. जेवढे म्हणून दृष्टीगोचर जगत आहे तो सर्व या प्रभुचाच पसारा असून हा प्रभू सृष्टीचा रचनाकार आहे शिवाय दीन-दुःखी भक्तांचा रक्षणकर्ताही तोच आहे. भवसागरातून पार जाण्यासाठी तो स्वतःच नाव आहे आणि नावाडीही आहे. त्याचा विस्तार अपरिमित असून वेद-ग्रंथ त्याचे वर्णन करता करता थकून गेले. हा ईश्वर जप-तप किंवा व्रत-वैकल्याने प्रसन्न होणार नाही. सद्गुरुची कृपा झाली तर मात्र त्याचे रुप क्षणार्धात दिसू लागते.

बाबा अवतारसिंहजींनी या पदामध्ये अनेक तात्विक मुद्यांचा ऊहापोह केला आहे. प्रकृतिच्या पाच

तत्वांपैकी आकाश हे तत्व विशाल आणि अत्यंत सूक्ष्म असल्याचे अनुभवास येते. बऱ्याचदा आकाश हाच परमात्मा असा भ्रम निर्माण होतो. आकाश आणि निराकार ईश्वरामध्ये बरेच साधर्म्य वाटते. परंतु आकाश म्हणजे ईश्वर नसून आकाशाहून विशाल आणि आकाश तत्वाहून सूक्ष्मतम असे परमतत्व म्हणजे ईश्वर होय. आकाशामध्ये अनेक गुण सामावले आहेत, आवाज हाही आकाशाचा गुणधर्म आहे आणि तो जड आहे. शिवाय काम, क्रोध, शोक, मोह, भय, अज्ञान आणि शून्यत्व असे विभिन्न गुण आकाशाच्या अंगी आहेत असे शास्त्रांत नमूद करण्यात आले आहे. ईश्वर मात्र निर्गुण आहे, गुणातीत आहे त्यामुळे तो आकाश असू शकत नाही. संतश्रेष्ठ नामदेव महाराजांनी आपल्या अभंगवाणीमध्ये म्हटले आहे की,

सत्य ज्ञानानंत गगनाचे प्रावर्ण। नाही रुप गुण वर्ण जेथे।

गगन म्हणजे आकाश. गगनाचे प्रावर्ण म्हणजे आकाशाचे वस्त्र. आता आकाशाला जर वस्त्र परिधान करायचे असेल तर नक्कीच ते आकाशापेक्षा मोठे असायला हवे. ईश्वराने आकाशालाही आपल्या कवेत घेतले असल्याकारणाने महापुरुषांनी त्याला आकाशाचे वस्त्र म्हटले आहे.

दुसरी बाब याठिकाणी शहनशाहजींनी स्पष्ट केली आहे ती म्हणजे ईश्वराचे नामकरण. वास्तविक ते परमतत्व नाम-रुपाच्या पलीकडे आहे. ते निनावी आहे. पण त्याला आळवण्यासाठी, वश करण्यासाठी साधु-संतांनी त्याचे आपापल्या परिने नामकरण केले. समयाचे सद्गुरु निरंकारी बाबा यांनीही त्या ईश्वराचे ''निरंकार'' असे नामकरण केले आहे. कारण ईश्वर निराकार आहे आणि त्याचे नावही निरंकार म्हणजे निराकार ठेवले, म्हणजे त्याला आळवणे अधिक सोईचे व्हावे. नामाचा उच्चार करताच समोर त्याचा साक्षात्कार होत रहावा, दर्शन होत रहावे.

ईश्वर हा सृष्टीचा रचनाकार आहे. या सृष्टीतील एक एक गोष्ट नियमबध्द असून त्यातील सौंदर्य अद्भुत आहे. असे हे विश्व प्रभुचीच निर्मिती होय. हा ईश्वर दयाळू असून आपल्या भक्तांचा रक्षणकर्ता आहे. सद्गुरुकृपेने जो कोणी या ईश्वराला जाणून घेतो त्याच्यासाठी तो स्वतःच नौका व नावाडी बनून त्याला भवसागरातून पलीकडे घेऊन जातो.

हा ईश्वर निर्गुणही आहे आणि सगुणही आहे. तो अत्यंत अद्भुत आहे. त्याचे वर्णन शब्दांनी करता येण्यासारखे नाही. म्हणूनच त्याच्या अनंत गुणांचे वर्णन करता करता वेद-ग्रंथही थकून गेले. म्हणूनच समर्थांना दासबोधामध्ये लिहावे लागले की,

नव्हे जाणता नेणता देवराणा।
न ये वर्णिता वेदशास्त्रां पुराणां।
नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा।
श्रुती नेणती नेणती अंत त्याचा।

क्रमशः

-श्री. स. वि. लव्हटे (जुईनगर)

सेवा - गुरुभक्तीचं एक अंग

सत्संग, सेवा, नामस्मरण ही तीन दिव्य कर्म सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी आपणास ब्रह्मज्ञान प्रदान करीत असताना आपल्या पवित्र वाणीमधून आपणास सांगितलेली आहेत. त्यामागील सेवा हा दोन अक्षरी शब्द. पण जीवनाचे सार सर्वस्व सामावलेला, मानवी जीवनाला विशालतेकडे, विनम्रतेकडे, शुध्दतेकडे नेणारा पवित्र शब्द. सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या पवित्र मुखामधून वारंवार संदेश देताना प्रगट होणारा शब्द. यामध्ये दोनच अक्षरे आहेत. पण यामधले तत्व बहुविध आहे, कारण हा सदगुरुंची भक्ती करीत असताना प्रत्येक महापुरुष, माता-भगिनी, बालकं यांच्यामध्ये आवश्यक असणारा अत्यंत महत्वाचा गुण आहे.

पूर्वीपासून जे अवतारी महापुरुष होऊन गेले त्यामध्ये प्रभू श्रीरामचंद्र, भगवान श्रीकृष्ण, भक्त हनुमंतराय यांनीही त्यावेळच्या सदगुरुंच्या आदेशानुसार सेवा केलेली आहे. प्रभू श्रीरामचंद्रानी वसिष्ठ ऋषींना शरण गेल्यानंतर त्यांच्या आश्रमात सेवा केलेली आहे. भगवान श्रीकृष्णांनी सांदिपनी ऋषींच्या आश्रमात पाणी भरणे, जळण गोळा करणे ही कामे केलेली आहेत व सदगुरुंची सेवा केलेली आहे. भक्त हणुमंतरायानी तर प्रभू श्रीरामचंद्र हेच दैवत मानून दास्यभक्तीच्या माध्यमातून त्यांची अखंड सेवा केलेली आहे. सेवेमधूनच भक्तीची वाट जात असते. त्यामुळे सदगुरुभक्तीचे एक प्रमुख अंग म्हणून सेवेला गुरुभक्तीमध्ये अनन्यसाधारण असे महत्व आहे. सेवा ही भक्तिमार्गातील एक प्रमुख वाट आहे. त्यामुळेच संत तुकाराम महाराज ही भक्त हनुमंतरायाला शरण जातात आणि ते म्हणतात.

शरण शरण हणुमंता। तुज आलो रामदूता।
काय भक्तीच्या त्या वाटा। मज दावाव्या सुभटा।

सेवा का करायची? असा प्रश्न अनेकांना पडू शकतो. मोठमोठया विशाल संतसमागम प्रसंगी अनेक सेवा कराव्या लागतात. मग पार्किंग पासून ते बाथरुम सफाई, मंडप डेकोरेशन, अग्निशमन विभाग ते लंगर, पाणी वाटप, प्रकाशन विभाग तर या सर्व सेवा करण्यानेच आपला शुद्रपणा वाढीस लावणारा, आपणास संकुचित बनविणारा अहंकार नष्ट होत असतो, आपला 'मी' पणा संपवणारा. मानव जात एक आहे याची कल्पना देणारा, लहान थोरपणा न मानता सगळीकडे समदृष्टीने पाहायला लावणारा, सदगुरुंच्या चरणाशी जोडून ठेवणारा सेवा हाच गुरुभक्तीमधला खास दुवा आहे. सेवा ही तनाने म्हणजे शरीराने केली जाते, मनाने केली जाते व धनानेही सेवा केली जाऊ शकते; यामागे निष्काम, निरिच्छित भाव असावा. तरच सदगुरुंच्या चरणावर ती सेवा रुजू होऊ शकते.

आजच्या कलियुगातील मानव प्राणी सर्व समस्येमुळे दु:खी झाला आहे. काही वेळेस तर जीवनाचा नेमका अर्थ काय? हे देखील न समजण्याइतपत अज्ञान निर्माण झाले आहे. त्यावेळेस माणसा-माणसात एकी निर्माण करणारी, संकटकाळात एकमेकांसाठी मदत करण्याचा भाव निर्माण करणारी गोष्ट म्हणजे सेवा. सेवा करण्यामागे शुध्द भाव असल्यामुळे एखाद्याचे संकट संपून धीरता प्रदान होण्यास सेवा ही बहुमोल ठरत असते.

सदगुरु भक्ती करत असताना सेवा केल्यामुळे आपल्या जीवनाचा सर्वांगिण विकास होत जातो याचे सुंदर वर्णन शहनशहा बाबा अवतारसिंहजी महाराज यांनी पवित्र अवतार वाणीमध्ये केलेले आहे. ते म्हणतात,

ज्या धन द्रव्य प्राप्तीसाठी मानव नित्य धावतसे।
सदगुरु सेवा करण्याने ते स्वत:च चालूनी येत असे।
ज्या सुख शोधासाठी मित्रा सदैव तू धडपड करिशी।
सर्व सुखांची होईल प्राप्ती जडता प्रीती संतांशी।

मान प्रतिष्ठेसाठी ज्या तू उत्तम कर्मा आचरिशी।
संत जनांची सेवा करिता क्षणी सर्व ते मिळविशी।

(अवतारवाणी पद क्र. ११३)

म्हणजेच आपल्या लक्षात येईल की, सेवेमध्ये किती ताकद आहे. एखादा महापुरुष सेवेसाठी इच्छुक असेल तर सेवेसाठी लागणारे धन सदगुरुंना आपल्या कृपेने त्यास द्यावे लागते. त्यामुळे सेवा करण्याने दारिद्र्याचा, गरिबीचा नाश होऊ शकतो. संतांशी, सदगुरुशी सेवेच्या माध्यमातून आपले प्रेम जडत असते. त्यामधूनच जीवनातल्या अनेक उणिवांची भरपाई देऊन आपण समस्यामुक्त होऊ शकतो. सर्वत्र गुरुभक्त म्हणून आपला आदर सत्कार होत जातो. त्यामुळे गुरुभक्तीला एक वेगळा रंग चढत जातो. सेवेमुळे अनेक समस्या मुळात निर्माणच होऊ शकत नाहीत.

पूर्वीपासूनच सदगुरुची सेवा प्रत्येक शिष्याने केलेली आवडते. केवळ सदगुरुंची किंवा आश्रमापुरती असा भाव त्यामागे निश्चितच नाही. तर सदगुरुंच्या आदेशाने कित्येक अवतारी महापुरुषांनी धर्मजागृतीचे कार्य केलेले आढळते. समाजसुधारणेचे कार्य केलेले आढळते. अलिकडील काळातील उदाहरण द्यायचे झाले तर स्वामी विवेकानंदजींनी आपले सदगुरु रामकृष्ण परमहंस यांच्या आदेशाने परदेशातही मानवधर्माचा प्रसार केला.

आज बाबाजीही प्रचारासाठी प्रत्येक साधसंगतला आदेश देत असतात. हा प्रचार आपण जर तन-मन-धनपूर्वक केला तर ती सेवा महान ठरु शकते. आज बाह्य जगतातही संत निरंकारी मिशनची सेवेच्या माध्यमातून वेगळी ओळख झालेली आहे. आपल्या मिशनमध्ये सेवेला फार महत्व प्राप्त झालेले आहे. कारण सेवेमुळेच मानवजात एकमेकाजवळ येण्यास हातभार लागणार आहे, हे समयाचे सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी ओळखलेले आहे. या धावपळीच्या युगात आज कोणासाठीही आपणास वेळ नाही. पण संत निरंकारी मंडळाने आपणास हा सेवेचा मार्ग उपलब्ध करुन दिला त्यामुळेच आपणास सेवेचे वर्म कळून आलेले आहे. आज आपल्या मंडळाचे अनेक दवाखाने, शाळा, हॉस्पिटल आहेत. तेथे महापुरुष-माता भगिनी भरपूर मानवमात्राची सेवा करीत आहेत. सर्वत्र परमेश्वर हा विराजमान आहे या सदगुरुंच्या शिकवणुकीमुळे आज या सेवेमुळे सर्वत्र प्रेमभाव निर्माण होण्यास मदत झालेली आहे. गरीब, श्रीमंत, उच्च-नीच असा भेदभाव सेवेत नसल्यामुळे कुणीही कुणाचीही सेवा करताना आपण जेव्हा सदगुरुंच्या कृपाछत्राखालील विशाल संत समागमामध्ये पाहतो तेव्हा खरंच वाटतं की, किती महान अर्थ भरलेला आहे या सेवा कर्मामध्ये.

सेवा करणारा हा सेवक म्हणून ओळखला जातो, दास म्हणून ओळखला जातो. गुरुभक्तीचे वर्मच मुळी सेवेमध्ये आहे. कारण सर्वकाही दृष्ट्या दास किंवा सेवक हा सदगुरुंच्यावर अवलंबून असतो.

सेवकाने सदगुरु भक्ती करीत असताना सेवा कशी करावी याचे सखोल मार्गदर्शन शहनशहा बाबा अवतारसिंहजी महाराज यांनी आपल्या पवित्र अवतारवाणीत केलेले आहे. सेवा करीत असताना सेवकाचा सदगुरुप्रति काय भाव असावा याचे वर्णन शहनशहांनी केलेले आहे. ते म्हणतात,

स्वामीचा जो सेवक आहे सर्वांज्ञा पालन करितो।
स्वामीचा जो सेवक आहे सदैव जनसेवा करितो।
स्वामीचा जो सेवक आहे असे गुणांनी तो भरपूर।
स्वामीचा जो सेवक आहे दुष्कर्मातून राहे दूर।
स्वामीचा जो सेवक आहे स्वामी तया संगे राही।
स्वामीचा जो सेवक आहे हरि रंगी रंगून राही।
स्वामीचा जो सेवक आहे प्रभूचे नाम सदा जपतो।
स्वामीचा जो सेवक आहे लाज तयाची रक्षियतो।
स्वामीचा जो सेवक आहे तो न कधी तक्रार करी।
म्हणे अवतार अशा भक्तांचे मालक स्वतः ध्यान करी।

(सं.अ.वा. पद क्र. ९६)

आज सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांना आपल्या सेवेमध्ये हा अर्थ अभिप्रेत आहे. केवळ सेवाच नाही तर सेवेपासून जे गुण प्राप्त होतात. त्या गुणांची जोपासना प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. ब्रह्मज्ञानाची अभिव्यक्ती कर्मात प्रकट करण्यासाठी सदगुरुंनी सेवा हे माध्यम आपणास दिलेले आहे. ज्यावेळेस सदगुरु एखादा आदेश आपल्या भक्तांसाठी काढतात त्यामागे आपले सर्व बाजूंनी कल्याण व्हावे अशी त्यामागे धारणा असते. काम, क्रोध, मोह, इच्छा,द्वेष, निंदा यापासून सदगुरुंना आपणास वाचवायचे असते. या इहलोकात कुठल्याही सांसारिक, आर्थिक बाबीत मन न गुंतता ईश्वर सेवेसाठी मनाला वाहून घेण्यासाठी सेवा भाव हा एक महत्वाचा पैलू आहे. अनेक मोठी कामे सेवा कार्यातून निर्माण केली जाऊ शकतात. त्यामुळेच सेवा हा सदगुरुंचा आदेश आहे. तो मनोमन पालन करण्यानेच आपण मुक्तीपर्यंत पोहोचणार आहे.

आपला उत्तम धर्म म्हणजे सदा समोर निराकार परमात्मा पाहणे व उत्तम कर्म म्हणजे साधुसंताची सेवा करणे. म्हणून पवित्र अवतारवाणीत शहनशहा बाबा अवतारसिंहजी महाराज म्हणतात,

सन्मुख सदा हरिला पाहे याहून उत्तम धर्म नसे।
साधुजनांची सेवा करणे याहून उत्तम कर्म नसे।
जो संताच्या सेवेसाठी अर्पण धन संपत्ती करी।
समजावा तो निजमनीचा मळ धुऊनी साफ करी।

(सं.अ.वा. पद क्र. १५४)

हीच भावना सर्वत्र निर्माण व्हावी व जग एका मंगल धाग्यात बांधले जावो हीच सदगुरु चरणी अरदास. कारण सेवा हेच एक गुरुभक्तीचे मुख्य अंग आहे.

श्री. चंद्रकांत व पांडुरंग अवसरे,
देशिंग, सांगली

सद्‌गुरुचे सेवक

(चाल : भातुकलीच्या खेळामधली.....)

सद्‌गुरुचे सेवक आम्ही करुया सेवा आम्ही
तन-मन-धन ही देण प्रभुची लावू तयाच्या कामी ।।धृ।।

प्रभू राम अवतरले तेव्हा वानर सेना होती
द्वापारी सवंगडी जमविले पेंद्या सुदामा गोपी
खाकी निळी वर्दी ही अमुची सद्‌गुरु अमुचा स्वामी ।।१।।

आदेश येता गुरुदेवांचा सेवक हजर होती
तना-मनाने करुन सेवा आनंदाने रहाती
संत जनांची सेवा घडावी संधी असे ही नामी ।।२।।

समान आहे सर्वच सेवा सेवादारांसाठी
आशीर्वाद सद्‌गुरुचा आहे सदैव यांच्या पाठी
संत समागम सद्‌गुरु दर्शन बोनस हा हंगामी ।।३।।

सेवादल हे सदैव तत्पर मानव सेवेसाठी
कृपा करुनी द्यावी सेवा सद्‌गुरु अमुच्यासाठी
तव दासांचा दास हा राहो गणपत जन्मोजन्मी ।।४।।

गणपत रा. नेमन
वेंगुर्ले

सेवा - निष्काम निरिच्छित असावी

सेवा करा हो सेवा, पुण्याईचा ठेवा।
हीच खरी देवपूजा सांगे हा सदगुरु माझा।।

सेवेचे महत्व आपण युगानुयुगे ऐकत आलो आहोत. सेवेचे महत्व जो जाणतो व मानतो, तोच त्यात अनन्य भावाने समर्पित होतो. मग ती सेवा लहान की महान, छोटी की मोठी, सुंदरतेची की कुरुपतेची याचा तो विचार करत नाही. ज्याच्या अंगी प्रेम-नम्रता आहे, अहंभाव निमाला आहे; तोच यात गढून जातो. आपल्या सेवा वृत्तीने दुसऱ्यांना आनंद मिळावा, त्याला समाधान व्हावे, दु:खितांचे दु:ख शमन व्हावे व ती व्यक्ती आनंदी व्हावी; ही कृतकृत्यता सेवाभावीला वाटते. हे एक असे मानवतेने भरलेले अतुल्य समाधान आहे. मानवता हा धर्म आहे, तर मानवतेची सेवा करणे हे परमेश्वर निर्मित कार्य आहे. अशी सेवा करणारी व्यक्ती परमेश्वराला अत्यंत आवडते. त्याच्या जवळ त्या भगवंताचे वास्तव्य असते. **''चोखा म्हणे देव भावाचा भूकेला। म्हणोनी स्थिरावला भीमातटी।''** जो देवाजवळ काही मागत नाही, मनी कुठली इच्छा धरीत नाही, निष्पृह वृत्तीने मार्ग आक्रमीत असतो अशा भक्ताची सेवा भगवंताला आवडते.

जळी स्थळी, काष्टी, पाषाणी, सृष्टीच्या कणाकणात, प्राणिमात्रात, प्रत्येक वस्तूत परमेश्वर आहे. त्याची सेवा करणे, तना-मनाने, निरिच्छ वृत्तीने प्रसंगोप्पात करणे गरजेचे असते. ही भावना जिथे रुजलेली असते. तिथे कोणत्याही प्रकारे परकेपणाचे, तुच्छतेचे अस्तित्व नसते.

चंद्र-सूर्य ते म्हणत नाहीत, प्रकाश आम्ही देतो कुणा।
नदी वहाते म्हणत नाही, पाणी आपण देतो कुणा।
राव असो की रंक असो, सुंदर कुरुप कुणीही असो।
सर्वांसाठी देती फळे, वृक्ष उन्हात तापत असो।

अशी आवडीने, प्रामाणिकपणे, निष्काम वृत्तीने सेवा करण्याने स्वत:चे व समाजाचेही कल्याण होते. श्रध्देने केलेली सेवा ही भक्ती असते आणि भक्तिच्या अंतरंगात प्रभूवस्ती आहे. नम्रता, प्रेम, भक्ती देवाला प्रिय आहे. कर्मकांड भक्ती करणाऱ्याला हे पटत नाही.

दुग्ध-शर्करा, दही, तुपाने,
मूर्त भिजविती अभिषेकाने।
आरती गाऊनी, वाद्ये वाजवूनी,
पूजा बांधती तृप्त मनाने।।

भगवंताने गीतेत सांगितलेले तत्वज्ञान मानव कधी समजून घेणार आहे कोण जाणे? ज्ञानेश्वर माऊलींनी किती सोप्या भाषेत सांगितले आहे की, **''योग याग विधी तेणे नोहे सिध्दी। वायाची उपाधी दंभधर्म।''** परमेश्वराला हे काहीच नको असते. त्याला हवी असते सम्यक दृष्टी, निष्काम, निष्पृह, कर्मयोग भक्ती. भिल्लीन शबरीला तिच्या गुरुंनी सांगितले होते की, या आश्रमात तुझे प्रभू तुला भेटतील. तेव्हापासून शबरी आतुरतेने भगवंताची वाट पाहत होती. रोज रस्ता झाडून फुलांनी सजवून ठेवत होती. तिच्या भोळया भक्तीला भुलून जाऊन श्रीरामांनी तिची उष्टी बोरे चाखली. विठ्ठलभक्त चोखा लोकांची गुरे चारायला नेई. गुरे चरत आणि चोखा भक्तीगायनात तल्लीन होई. इकडे गुरे रानोमाळ जायची. तेव्हा प्रत्यक्ष ती राखावीत व तिन्ही संधिकाळी ती घरी पोहचवावीत, कबीराचे शेले विणणे, गोरोबांचा चिखल तुडविणे, जनीचे दळण दळणे ही कामे हरी करी. या संतांना मात्र प्रभू भक्तीचे गायन करता करता आपले काम विसरायचे व ते काम कसे झाले ते त्यांना कधी कळायचेच नाही.

संत एकनाथ महाराजांनी केलेली भक्ती कशी होती हे सर्वांना माहीत आहे. ज्या काळात अस्पृश्यांना शिवून घेत नसत, नव्हे त्यांच्या सावलीचाही विटाळ होत असे. अशावेळी त्यांच्या घरी एक अस्पृश्य मुलगी फुले घेऊन येत असे. त्यांच्या घरी भजन-कीर्तनास सर्व जातीची लोकं येत होती. संत एकनाथ महाराज ठामपणाने आपले विचार मांडत होते की, ब्राह्मण कुळात जन्मला म्हणून तो ब्राह्मण, पण खरा ब्राह्मण तोच जो ब्रह्मज्ञानी होय. दीन-दलित-गरीबात परमेश्वर पहा. त्यांची सेवा करा. ती ईश्वर सेवा होते असे साधुसंत नेहमीच सांगतात. स्वत:ही या सेवेला वाहून घेतात. यात संत एकनाथ महाराजही होते. एकदा वाटेत एके ठिकाणी एक गाढव तहानेने

तळमळत होते. उन्हाने तडफडत होते. लोक बाजूने जात होते, त्या प्राण्याची कुणालाही दया आली नाही. सर्वघटी परमेश्वर हे सर्वजण विसरुन गेले होते. पण एकनाथांनी पाण्याची कावड खाली ठेवली. बघता बघता महाराजांनी घागर उचलली व त्या व्याकूळ प्राण्याला गंगेचे पाणी पाजले. गाढव शांत झाले, तृप्त झाले व एकनाथ महाराज समाधानी झाले. ही खरी भुतदया. या निष्काम सेवेला, करुणामय सेवेला भगवंत भावतो. भक्तांच्या सहवासासाठी तो पुन्हा पुन्हा अवतरतो.

गुरु भक्तीचे झाड लावियले दारी,
त्याने हरि मनी तोषियेला।

गुरु म्हणजे ईश्वर. ईश्वर तोच गुरु-सदगुरु होय यात मुळीच शंका नाही असे सदगुरु बाबा अवतारसिंहजी महाराज अवतारवाणीत म्हणतात. हा परमेश्वर भक्तांना भेटण्यासाठी युगायुगात अवतरतो. आपला भक्त मायेला फसतो का याची वारंवार परीक्षा घेतो.

धन्य ती भरतभूमी जिच्या पोटी अशी नररत्ने जन्मली. थोर समाजसेवक बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांची सेवा केली. कुठलीही घृणा तिरस्कार न करता अखंड आयुष्य त्यांच्या सेवेत घालविले. तोच वसा त्यांचा मुलगाही चालवत आहे. जनसेवा ईश्वर सेवा मानून कार्यरत आहे. अशातऱ्हेने सेवा भक्ती करणारे भक्त देवाला आवडतात. दीक्षा घेऊन गुरुभक्तच असावेच असे नाही. कुणी देशभक्त असतो, कुणी ईशभक्त असतो, कुणी माता-पिता भक्त असतो. **''पुंडलिक भक्त बळी। विठू आणिला भूतळी।.''** निस्सिम बंधुप्रेमाने सेवा करणारा लक्ष्मण, राज्य पायासी आले तरी त्यागाने बंधुचरण न सोडणारा बंधुप्रेमी भरत. किती पहावेत सद्वचन व आपल्या सद्विचाराला जागणारे महापुरुष. आपल्या भक्तांची निष्काम कामवृत्ती पाहून परमेश्वराला सुध्दा भक्तांच्या सान्निध्यात यावे वाटते. त्यांची सेवा करण्याचा मोह होतो आणि यासाठीच परमेश्वर या भक्तांच्या मेळ्यात पुन्हा पुन्हा अवतार घेऊन येत असतो. आवडीने, नम्रतेने सेवेत रत होतो.

तिन्ही लोकांचा स्वामी नारायण भक्त बाळ प्रल्हादासाठी काष्टाच्या खांबात गुरुगुरत, डरकाळ्या फोडीत प्रगट झाला. अधर्म्याचा नाश केला. संत मीराबाईला सासरच्या लोकांनी दिलेला विषाचा प्याला स्वतः प्राशन केला आणि श्रीखंड्या बनून प्रभू विठ्ठल एकनाथ महाराजांच्या घरी घरगडी म्हणून राहिला.

या देवाची करणी अशी भारी हो।
त्याने उचलल्या उष्टया पत्रावळी हो।

पांडव भगवंताचे आवडते. त्यात अर्जुन तर त्यांचा जीवन कंठस्य सखा होता. ही गुरु शिष्याची जोडी खूप अगम्य होती. पांडवांनी क्षणभरासाठी सुध्दा भगवंताला कधी स्मरणातून विसरले नाहीत. मग ते राजवाड्यात, वैभवात असोत की वनवासात असोत. दुर्योधनाच्या कपट कारस्थानात प्रत्येक वेळी प्रसंगावधान राखून पांडवांच्यापाठी राहून त्यांना वाचविले आहे. पांडवांच्या यज्ञकर्मात श्रीकृष्णांना किती मान! परंतु या जगत्विधात्याने समारंभास आलेल्या अतिथींचे हसतमुखाने स्वागत करुन पंक्तीत वाढप्याचे काम केले. त्यांच्या उष्ट्या पत्रावळी उचलल्या. किती हा सेवाभाव! आपल्या आवडत्या भक्तांसाठी.

कौरव-पांडवांचे कुरुक्षेत्रावर धर्मयुध्द झाले तेव्हा त्यांनी-भगवंतांनी किती पक्क्या निश्चयाने पार्थाचे सारथीपण स्वीकारले. अर्जुन महारथी अन् कृष्ण भगवान सारथी. तिन्ही विश्वाचा मालक, पालक, चालक असा तो ईश्वर अर्जुनाच्या रथाचा सारथी बनून घोडे वळविण्याचे, रथ चालकाचे काम स्वीकारतो. धर्मरक्षणार्थ सत्याची बाजू घेऊन पुण्याची महती वाढविण्यासाठी व पापांचे, पाप्यांचे क्षालन, निर्दालन करण्यासाठी या भगवंताने, द्वारकाधिशाने, तिन्ही लोकांच्या परमेश्वराने आपले मोठेपण, अभिमान, सत्ता हे सर्व बाजूला ठेऊन पार्थाच्या रथाचे लगाम हाती धरले आणि जगाला दाखवून दिले की ईश्वर भक्तांच्या प्रेमापोटी अवतरतो व त्यांचे रक्षण करतो व त्यांच्या सहवासात राहतो. असा हा भगवंत आपल्या भगवंतपणाचा त्याग करुन सेवाभाव, नम्रता, निष्पृहता भक्तांना दाखवितो अन् निष्काम, निरिच्छित सेवा करणाऱ्या भक्तांत येऊन राहतो.

धन्य तो भगवंत व धन्य ते भक्त!

सौ. विजयमाला गोपीनाथ पवार
सांगली

सेवा - सुखांची खाण

समयाच्या सदगुरुकडून परमपित्या ईश्वराचा बोध झाल्यानंतर हा निराकार प्रभू प्रत्येक श्वासात विराजमान राहण्यासाठी व त्याच्याशी एकरुप होण्यासाठी सत्संग, सेवा, नामस्मरण या तीन कर्मांना जीवनाचे अविभाज्य अंग बनविणे गरजेचे आहे. त्यामुळे ही जीवनरुपी बॅटरी चार्ज होऊन योग्य मार्गावरुन चालत राहते.

वास्तविक या तिन्ही कर्मांची ज्ञानावर दृढ राहण्यासाठी आवश्यकता आहे. तरीही गुरुभक्ताच्या जीवनात सेवेला फार महत्व आहे. सेवा हे असं कर्म आहे जे श्रध्दा, प्रेम आणि निष्काम भावनेने केले जाते. त्यात कोणत्याही प्रकारची देण्याघेण्याची भावना नसते.

सेवेचं फळ सेवा करत असतानाच प्राप्त होत असतं. जेव्हा सेवा भावनेने कोणतेही कर्म केले जाते तेव्हा गुरुभक्ताला आत्मिक आनंद प्राप्त होतो, जो वास्तविक फलस्वरुप असतो. सेवेत जर आपली कामना नसेल, स्वार्थ नसेल, तर ती सेवा सेवादाराला अहंकाररहित करते आणि या अहम्‌चा नाश हीच मुळात आनंदाची उत्पत्ती आहे. कारण जसं म्हटलं गेले की, **''जहाँ अहंकार है। वहाँ निराकार नही।''** आणि हा निराकार ईश्वर फक्त आनंदविभोर आहे.

गुरुभक्ताची सेवा मनाला विशालता, प्रेम, नम्रता आणि सद्‌भावना प्रदान करते. जेव्हा संत महापुरुष मिळून मिसळून सेवा करतात तेव्हा परस्पर सहयोग आणि त्याग यासारख्या भावना वाढीस लागतात आणि हे नम्र झालेले मन संतांच्या आशीर्वादाला पात्र ठरते. म्हणून शहनशहा बाबा अवतारसिंहजी अवतारवाणी मध्ये म्हणतात,

जो संतांच्या सेवेसाठी
अर्पण धन संपत्ती करी।
समजावा तो निजमनीचा
मळ धुऊनी साफ करी।

(अवतारवाणी पद क्र.१५४)

सेवा तन, मन, धनाची शक्ती वाढविते. जेव्हा सदगुरु दयाळू होतो आणि त्यांची कृपादृष्टी भक्तांवर पडते तेव्हा दयाळू सदगुरु भक्ताला सेवेची सुसंधी प्राप्त करुन देतो. ज्या गुरुभक्ताला एखादी सेवा मिळाली त्याने तर सदगुरुचरणी क्षणोक्षणी नतमस्तक व्हायला पाहिजे. कारण सदगुरुने कृपावंत होऊन ती संधी दिलेली असते. वास्तविक सदगुरु कोणतेही काम कोणत्याही शरीराद्वारे करुन घेऊ शकतो. कारण शक्ती तर सदगुरुचीच काम करत असते, पण नाव मात्र गुरुभक्ताचं मोठं होत असते.

महाभारत युध्दाचे वेळी कौरव, पांडवांच्या सैन्यातील महापराक्रमी योध्दे एकमेकासमोर त्वेषाने लढत होते. वास्तविक कौरवांचे सैन्यामध्ये वयोवृध्द भिष्माचार्य, गुरु द्रोणाचार्य, कृपाचार्य, कर्ण असे एकापेक्षा एक योध्दे होते जे पांडवांपेक्षाही पराक्रमी होते. तरी सुध्दा विजय पांडवांचा झाला. कारण एकच की, पांडवांच्या बाजूने अर्जुनाच्या रथावर सारथ्य करणारे श्रीकृष्ण हे सर्व करण्यास समर्थ होते. ते अर्जुनाच्या पाठीशी भगवंत म्हणून तर होतेच, पण सदगुरु सुध्दा होते. ज्यामुळे एवढ्या मोठ्या अफाट कौरव सेनेवर पांडवांना विजय मिळविणे शक्य झाले.

म्हणूनच जो गुरुभक्त हे रहस्य जाणतो, तोच अकर्ताभावाने सेवा करु शकतो. अकर्ता भावनेने केलेली सेवा ही खऱ्या आनंदाचं उगमस्थान ठरते. म्हणूनच गुरुभक्त मिळालेली कोणतीही सेवा ही सदगुरुकृपा समजून सदगुरुला धन्यवादच देत असतो. जसे,

तोच करी साधुची सेवा
ज्या करवी करविता हा।
अवतार तोच गुण गाईल हरिचे

मुखे जयाच्या वदविल हा।

(अवतारवाणी पद क्र. ७२)

सदगुरु आपल्या भक्तांना तन,मन,धनाने सुखी करण्यासाठी सेवेची संधी देत असतो. कुठे रक्तदान शिबिर, कोठे नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत इत्यादी सेवेचा उद्देश हाच असतो की, आपल्या गुरुभक्तांना सेवेच्या मैदानात उतरविणे. जेणेकरुन गुरुभक्ताची शारीरिक दु:खेही दूर व्हावीत आणि मन सुध्दा निर्भय, निर्मळ स्वच्छ पावन रहावे.

तन, मन, धनाची उत्तम सेवा तीच असू शकते जी मनात कोणतीही कामना, इच्छा न ठेवता सदगुरुचरणाशी नतमस्तक होऊन केली जाते. तीच सेवा सदगुरुला आवडते. कारण ती मनमर्जीने न करता गुरुच्या आदेशाप्रमाणे केली जाते. कारण गुरुभक्त प्रेमभावनेने सेवा करत असतो. कोणत्याही फळाची अपेक्षा ठेवून नाही. गुरुची खुषी हेच त्याच्या सेवेचं फळ असतं.

सेवा आदेशानुसार व अनुशासनबध्द असेल तर तीचा स्वीकार होतो. जो गुरुभक्त दास भावनेने सेवा करतो, तोच सदगुरुला आवडतो. असे गुरुभक्त सेवेची निवड करत नाहीत किंवा स्वत:ची आवड निवड दाखवित नाही. तो फक्त गुरुआदेशाचीच वाट पाहतो. आपली अक्कल हुशारी गुरुच्यापुढे दाखवत नाही. तर गुरुआदेशाला सत्वचन मानून सेवेची कमाई करतो. एका गुरुभक्ताला त्याच्या सदगुरुने मध्यरात्रीच्या सुमारास उठविले आणि कपडे धुण्यासाठी नदीवर जाण्याचा आदेश दिला. गुरुभक्त उठला. मध्यरात्रीची वेळ काळाकुट्ट अंधार! परंतु तो भक्त गुरुचा आदेश मानून नदीवर गेला. स्नान करुन कपडे धुऊन आणि पाणी घेऊन परत आला. तेव्हा सुध्दा अंधारच होता. शिष्याला अर्ध्यारात्री नदीवर पाठविले हे गुरुच्या ध्यानात आले. तेव्हा त्यांनी शिष्याला या विषयी विचारले तर शिष्य म्हणाला, मला रात्रीशी किंवा दिवसाशी काय देणेघेणे. कारण रात्र आणि दिवस या दोन्हीलाही बनविणारे आपणच आहात. मी तर फक्त आपल्या आदेशाचे पालन करणे एवढेच जाणतो. मला तर दिवस आणि रात्र सारखेच.

गुरुभक्त हा तर गुरुभक्ती आणि प्रेम यात बुडून सेवा करत असतो आणि सेवेची आत्मिक नशा प्राप्त करतो. अशा संतांच्या मागे भगवंत सुख, संपदा घेऊन फिरत असतो. गुरुबाणीचे एक महावाक्य आहे,

चारि पदारथ जे कोई माँगे।

साध जनां दी सेवा लागै।

(श्री आदिग्रंथ - २६६४)

सदगुरु बाबा गुरबचनसिंहजी महाराज म्हणतात, ''सेवा ही अशी गुरुकिल्ली आहे, जिच्याद्वारे तुम्ही सद्गुरुच्या भरपूर खजिन्यातून जे पाहिजे ते तुम्ही घेऊ शकता.''

याच तत्वाला जाणून गुरुभक्त जीवन जगतो. या जगाचा निरोप घेताना जमा केलेली भौतिक धनसंपदा सर्व सोडून जावे लागणार यासाठी अधिकाधिक सेवेची कमाई तो करत असतो. कारण ही भक्तीची कमाईच बरोबर येणार आहे आणि गुरुभक्त हे सुध्दा जाणतो की, गुरु दाता आहे. देणाराच आहे. त्यामुळे ज्यावेळी सदगुरुकडून एखादा सेवेचा आदेश येतो; तो गुरुभक्तासाठी त्याच्या सुखाचे दरवाजे उघडणारा असतो. म्हणून सदगुरुला सुध्दा आपले सेवादार प्राणापेक्षाही प्रिय वाटतात. अशा प्रकारे भक्त सहज भावनेने सेवा करत राहतो आणि सदगुरु सर्व प्रकारची सुखे आणि आनंद भक्ताला प्रदान करतो. म्हणून सेवा सुखाची खाण.

श्री. जगन्नाथ भोंजी होडशिळ

अहमदनगर

सेवेचं महात्म्य निरंकारी विचारधारेतून

'सेवा' दोन अक्षरांनी बनलेला अर्थपूर्ण व्यापक असा शब्द... जो बोलायला सरळ सोपा, परंतु कर्माने पूर्णत्वास जाण्यास कठीण... कारण सेवेचं खरं स्वरुप काय ? सेवा म्हणजे काय? सेवा का आणि कशासाठी? सेवेचं आपल्या जीवनात नक्की स्थान काय? या सर्व प्रश्नांचा उलगडा जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत सेवेचं महत्त्व कळणं कठीणच आहे.

''नम्रता, प्रेम, समर्पण, निष्काम, निरपेक्ष भाव, भक्तीचं एक अंग, परम कर्तव्य आणि श्रध्देचा आविष्कार म्हणजेच सेवा.''

सेवा नसावी वरपंग दांभिक, आत एक बाहेर एक ।
सेवा नसावी कृत्रिम सुरेख, कागदी फुलांपरी।।

सेवा करण्यासाठी सेवेची इच्छा असणं महत्त्वाचं आहे. सेवा ही वर-वर दिसायला सात्विक आतून मात्र कारस्थानी, कारकूनी वृत्तीची नसावी. जशी बाहेरुन सोज्वळ, लोकोध्दारक दिसते तशीच ती अंत:करणातूनही असावी. कृत्रिम फुलांसारखी सुवासहीन नसावी. सेवेत समर्पणभाव असणं महत्त्वाचं, कारण....जोपर्यंत आम्ही सद्गुरु चरणी समर्पित होत नाही तोपर्यंत ती सेवा कर्माने होणं कठीण. मनाची उपस्थितीही तितकीच अनिवार्य आहे. कारण मानवी मन हे फार चंचल आहे. त्याच्या भटकंतीला लगाम लावणं कठीण असतं. मोहमयी बाजारात फेरफटका मारायला त्याला वेळेचं बंधन लागत नाही. सेवेचं स्वरुप कोणतंही असो मन आणि आत्मा यांचं समर्पण होऊ शकलं तरच ती सेवा सद्गुरुच्या आशीर्वादास पात्र ठरते. सद्गुरुचा आशीर्वाद, संतांचे प्रेम आणि सत्कार सेवेची कमाई असते.

सेवा एक ऐसी कुंजी है, जिस से गुरुसिख सदगुरु के भरपूर खजाने से जो चाहे ले सकते है।

संपूर्ण अवतारवाणीमध्ये सेवेचा यथार्थ भाव प्रकट करताना शहनशाहजींनी म्हटले आहे -

तन मन धन सर्वाहूनी उत्तम सेवा ती गणली जाते।
जी होई निष्काम निरिच्छित सद्गुरुला ती आवडते।
देशकाल समया पाहूनी मार्गी ज्या गुरु चालवितो।
गुरु आज्ञेने पालन करुनी सेवक त्या मार्गे जातो।
इहलोकी परलोकी ऐशा मिळेल भक्तजना सन्मान।
अवतार सदा ऐशा भक्तांचे रक्षण करी स्वये भगवान।

(संपूर्ण अवतारवाणी पद क्र.२२६)

सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज सेवेच्या संदर्भात बोलताना म्हणतात, ''भक्त महापुरुष जे काही कार्य करतात ते सदैव समर्पण भावनेने करतात. हे प्रभू तूच ही सेवेची संधी प्रदान करीत आहेस. हृदयापासून सेवा करणारा कोणताही स्वार्थ न ठेवता सेवा धर्म आचरतो. सेवा सुख, समृध्दी आणि आनंद देते. परंतु सेवेचा अहंकार झाल्यास ती लाभाऐवजी हानीही पोहचवू शकते. यासाठी भक्ती मार्गामध्ये आज्ञेनुसार केलेल्या सेवेला महत्त्व आहे. आज्ञेचे पालन जो करतो तो स्वत:ला दास मानतो. अशा भावनेने जे सेवा करतात त्यांची पूजा होते. हनुमानाने भक्तीभावाने प्रभू श्रीरामाची जी सेवा केली तिचा प्रभाव असा पडला की, आज रामपेक्षाही हनुमानाची मंदिरे अधिक आहेत.''

''सेवा से भक्ती चमकती है, सेवा करनेवालों के मन में सदाबहार रहती है, लेकीन सेवा निष्काम भावसे ही होनी चाहीए। सेवा का अभिमान भक्त को ले डुबता है। आज दुनिया में उन्हीं भक्तों का नाम इतिहास में चमक रहा है, जिन्होंने फल की इच्छारहित होकर सेवा की है।''

सेवेचं महत्त्व सांगताना बाबा गुरबचनसिंहजी महाराज म्हणतात की, ''सेवा कोणत्याही प्रकारची असो ती सुखकारकच असते. जी मानसिक आनंदासोबत तप-त्याग, परोपकार, सत्कर्म आणि सद्भावनेसारखे दिव्य गुण प्रदान करते. सेवा आमच्या अंतरंगातील भेदभाव, अहंकार, तिरस्कार आणि घृणा

(पान १४ वर)

सेवा - सुखांची खाण

ब्रह्मज्ञान ही पूर्ण गुरुची ओळख आहे, तर ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर त्या ज्ञानावर आधारित जीवन बनविणे ही गुरुभक्ताची ओळख. गुरुभक्त गुरुकडून मिळालेल्या आदेश-उपदेशांना आपल्या जीवनाचा आधार बनवून सदगुरुने दिलेल्या सत्संग, सेवा, नामस्मरण या तीन पवित्र कर्मालंकाराने आपले जीवन सजवितो. त्यातीलच एक दैवी गुण आहे सेवा.

सन्मुख सदा हरिला पाहे याहून उत्तम धर्म नसे।
साधुजनांची सेवा करणे याहून उत्तम कर्म नसे।
जो संतांच्या सेवेसाठी अर्पण धन संपत्ती करी।
समजावा तो निजमनीचा मळ धुऊनी साफ करी।

(अवतारवाणी पद क्र.१५४)

एका बाजूला संसार आपल्या मनमतीनुसार कर्मधर्मात गुंतलेला आहे. मानवतेला काळीमा फासणाऱ्या अनेक घटना आज आम्ही पाहात आहोत. गोर गरीब, दीन-दुबळे, असहाय्य जनांना सेवेचा हात देण्याऐवजी पीडितांची रोजीरोटी, निवारा हिरावून घेणाऱ्या असुरी घटना नित्याच्याच झाल्या आहेत. तर दुसऱ्या बाजूला स्वत:ला धार्मिक आणि सेवाभावी म्हणून मानप्रतिष्ठा प्राप्त करुन घेण्यासाठी धार्मिक स्थळांना धन दौलतीचे दान देऊन धार्मिकतेचे विडंबन केले जात आहे. सेवेबाबत अतिशय सुंदर भाव बाबा अवतारसिंहजी महाराज अवतारवाणीच्या माध्यमातून आपल्यापुढे ठेवतात.

मान प्रतिष्ठेसाठी ज्या तू उत्तम कर्मा आचरिसी।
संत जनाची सेवा करीता क्षणी सर्व ते मिळवीशी।

(अवतारवाणी पद क्र.११३)

शुध्द भावनेने व पवित्र मनाने समर्पित केलेली तन-मन व धनाच्या निष्काम सेवेचे फळ निरंकार प्रभू आपल्या हाताने देत असतो. आणि हे फळ गुरुभक्ताच्या कल्पने पलीकडील असते. सेवा हा गुरुभक्ताच्या जीवनातील मौल्यवान अलंकार आहे. सेवा ही खऱ्या अर्थाने सुखाची खाण आहे; मग ती गुरुसेवा असेल, संतसेवा असो, समाजसेवा असो. मात्र ती निष्काम व निरागस व सहजभावनेने युक्त असावी.

तन मन धन सर्वांहूनी उत्तम सेवा ती गणली जाते।
जी होई निष्काम निरिच्छित सदगुरुला ती आवडते।

(अवतारवाणी पद क्र.२२६)

एक निर्विवाद सत्य आहे व त्या गोष्टीची अनुभूती आपणास हातोहात मिळते ती म्हणजे सेवा करण्याचा आनंद. हा दैवी आनंद ना आम्हाला भौतिक जगातील बाजारात ना दुकानात ना औषधनिर्मिती कंपनीत मिळत असतो. याच आनंदाची अनुभूती गुरुदरबारात गुरुभक्ताला संतसेवा व मानवमात्राच्या सेवेत मिळत असते. मात्र या सेवेचा आनंद तोच मिळवू शकतो जो गुरुआज्ञेत राहून गुरुमतानुसार निष्काम भावनेने सेवा करतो. सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज गुरुभक्तांना अमृतवाणीने समजवितात की, सेवा आत्मिक आधार आहे. सेवा केल्याने सर्व प्रकारच्या दु:खांचा नाश होतो. म्हणून आपल्याला सदैव तन-मन-धनाच्या सेवेसाठी तयार राहायला पाहिजे - (गुरुदेव हरदेव पान क्र.१२६)

सदगुरु गुरुभक्तांचे जीवन सुखी होण्यासाठी वेळोवेळी सेवेची संधी देत असतो. भक्ताने केलेल्या सेवेच्या प्रेमापोटीच संकट समयी सदगुरु गुरुभक्तांचे रक्षण करतो. वेद-पुराणांतील अनेक घटनांचा आम्ही आधार घेतो तेव्हा एक गोष्ट निश्चितपणे विचार करण्यास भाग पाडते की, सती सावित्रीच्या मुर्च्छित पतीचे प्राण यमराज नेऊ शकले नाहीत व तिचे सौभाग्य तिला परत मिळाले. कारण तिच्या ठायी संत, सदगुरु व पति सेवेचे पुण्य होते. बारा हत्तीचे बळ असलेला दु:शासन द्रौपदीचे वस्त्रहरण करु शकला नाही, कारण तिने एकदा आपल्या भरजरी साडीची चिंधी सेवा रुपाने भगवान श्रीकृष्णाच्या जखम झालेल्या बोटाला बांधली होती. निश्चितच ज्यांनी आपल्या सदगुरुवर विश्वास ठेवला सदगुरु-संतांची सेवा केली, त्यांची कामे स्वत: परमात्म्याने केली. सुदामाने आणलेले मुठभर पोहे श्रीकृष्णाने आवडीने खाल्ले. मात्र त्या सेवेच्या बदल्यात सुदाम्याचे दारिद्र्य नष्ट झाले. शबरीने प्रेमाने अर्पण केलेली उष्टी बोरे प्रभू रामाने

आवडीने खाल्ली. कारण...

देव हा भावाचा भुकेला। भावार्थ पाहून भुलला।
संकटी पावे भाविकाला। रक्षतिसे।

(दासबोध दशक - ३, समास - १०)

सांसारिक दृष्टीने जर आम्ही पाहिलं तर जे धनाचे इच्छुक जेव्हा गुरुच्या सेवेसाठी धनरुपाने योगदान देतात तेव्हा सहज भावनेने ते धनसुध्दा त्यांच्या पदरात पडत असते.

ज्या धन द्रव्य प्राप्तीसाठी मानव नित्य धावतसे।
सदगुरु सेवा करण्याने ते स्वत:च चालूनी येत असे।

(अवतारवाणी पद क्र. ११३)

असेही आम्ही पाहतो. शेतात बियाणे पेरताना जरुर आमच्या जवळचे धान्य कमी होते. मात्र पीक आल्यावर त्याच शेतात पेरलेल्या बियाण्यांच्या कितीतरी पटीने पीक आपल्या पदरात पडत असते. त्याचप्रमाणे गुरुसेवा, संतसेवा गुरुभक्ताच्या घरात सुखाचे रुप घेऊन येते.

आजच्या समयाला सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज वेळोवेळी संत समागमाचे आयोजन करतात. अशा संत समागमाच्या सफलतेकरीता प्रत्येक गुरुभक्ताला तन,मन व धनाने योगदान देण्याची संधी प्राप्त होत असते. सदगुरु विविध रुपाने धनाची सेवा करवू इच्छितात. कारण गुरुभक्त पराधीनतेपासून किंवा निर्धनतेपासून बाहेर पडावा. कारण म्हटलं जाते की,

सेवा तो धरम की खेती है।
उसमे जितना बोओगे उतना पावोगे।

आज सदगुरु बाबाजींनी एक पवित्र कार्य आरंभलेले आहे की, प्रत्येक जड जीवाने अज्ञानात जगणे पाप असून त्यात मानवमात्राची अधोगती आहे. त्यामुळे ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर ज्ञानाचा प्रकाश, मिशनचा दिव्य संदेश जनसामान्यांपर्यंत पोहचविणे ही प्रत्येक गुरसिखाची सर्वोत्तम सेवा आहे. सर्व प्रकारच्या दु:ख क्लेशा पासून सुटका होण्यासाठी सेवा करणे आवश्यक आहे. मात्र ही सेवा करण्यासाठी सेवेची अंत:र्मनातून इच्छा सुध्दा असणे महत्वाचे आहे. केवळ दिखाव्यासाठी व दुसऱ्याची प्रशंसा मिळविण्यासाठी केलेली सेवा गुरु दरबारी काय कामाची ? जी मनाला शांती, सुख व समाधान देऊ शकत नाही.

आज सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी समस्त निरंकारी परिवारासाठी अनेक सेवारुपी दानाची साधने उपलब्ध करुन दिली आहेत. जसे भवन निर्माण सेवा, समागम लँड सेवा, स्पेशल बिल्डिंग फंड सेवा, निरंकारी पत्रिका विभागातील पत्रिकांद्वारा करावयाची सेवा, जसं संत निरंकारी (मासिक पत्रिका), एक नजर (पाक्षिक), हसती दुनिया (लहान मुलांची मासिक पत्रिका), इत्यादी. आज समाजातील प्रत्येक स्तरावरुन या पत्रिका समाजात प्रशंसेस पात्र होत आहेत. या निरंकारी पत्रिका समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयास करणे ही सुध्दा सेवा म्हणून निरंकारी मंडळातील प्रत्येक सदस्याचे कर्तव्य बनते. सदगुरुने दिलेल्या आदेशानुसार प्रत्येक प्रकारच्या सेवेमध्ये प्रत्येक सदस्याने योगदान दिले तर सदगुरु बाबाजींच्या कृपाशीर्वादाने निश्चितच मिशन समाजाच्या काना कोपऱ्यात तीव्रगतीने घोडदौड करु शकेल.

नरेंद्र ग. पाटील, पेण, रायगड

(पान १२ वरुन)

यासारखे दुर्गुण बाहेर काढून आम्हाला पवित्र करते. सेवा ही एक अशी जादू आहे की, जी आम्हाला मजबूत करते. सत्संग आणि महापुरुषांची मन:पूर्वक केलेली संगत आमच्या अंत:करणात ज्ञानाची पवित्र किरणे प्रकाशित करते जी आमच्या मानसिकतेला निरोगी आणि निर्मळ बनविते.''

सेवेचं महत्त्व शब्दात वर्णन करण्यापेक्षा तिच्या आत्मिक सुखाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यात खरा आनंद आहे. जो अमोलिक आहे.

चला , तर एक प्रण करुया. सेवा - परम कर्तव्य मानून, धरतीला स्वर्गमय करण्यास सहाय्य करुया....

कु. वंदना लक्ष्मण दाभोळकर
चेंबूर, मुंबई

सेवा - निष्काम -निरिच्छित असावी

सेवेच्या बाबतीत सदगुरु माऊलींचे एक वचन आठवते की, सेवा यशासाठी नसते. जी सेवा निष्काम भावनेने होते तीच वास्तविक खुशी आणि संतोष देत असते. म्हणून संपूर्ण अवतारवाणीत म्हटले आहे की, जी होई निष्काम-निरिच्छित सदगुरुला ती आवडते. आम्हाला बाबाजींनी पाच प्रण, तीन कर्म देऊन आमच्या जन्माला येण्याचे सार्थक करुन दिले. खरं पाहिलं तर, पाच प्रण आणि तीन कर्म यामध्ये तर जीवनाची यशोगाथा भरलेली आहे. या गोष्टीवर जास्तीत जास्त विचार करणे अतिशय गरजेचे आहे.

सदगुरुने सेवेच्या अनुषंगाने जे अनमोल वचन आमच्या समोर ठेवले आहे, त्यानुसार जर सेवा केली तर प्रत्येकाचे जीवन आनंदमय बनेल यात तिळमात्र शंका नसावी. खरं तर सेवा ही सेवाच असते. ती निष्काम भावनेने, निस्वार्थपणे कुठल्याही ऐहिक सुखाच्या बदल्यात नसावी. परंतु मानवी मन खूप विचित्र असते. कुठलीही गोष्ट करताना आमच्या मनात पहिला विचार येत असेल तर फायद्याचा. सेवा केल्यानंतर मेवा किती मिळेल. शेवटी मेव्यावर नजर ठेवून केलेली सेवा फलदायी होत नसते. मात्र केलेल्या सेवेचा मेवा मिळाला नाही म्हणून दु:खी-कष्टी व्हावे लागते. कधी-कधी जेव्हा आम्हाला तन-मन-धन सेवेसाठी आदेश येतो तेव्हा त्यावेळी अगोदर आम्ही याच गोष्टीचा विचार करीत असतो.

ज्या धन द्रव्य प्राप्तीसाठी मानव नित्य धावतसे।
सदगुरु सेवा करण्याने ते स्वत:च चालून येत असे।
ज्या सुख शोधासाठी मित्रा सदैव तू धडपड करिशी।
सर्व सुखांची होईल प्राप्ती जडता प्रीती संतांशी।
मान प्रतिष्ठेसाठी ज्या तू उत्तम कर्मा आचरिशी।
संत जनांची सेवा करिता क्षणी सर्व ते मिळविशी।

(स.अ.वा. पद क्र.११३)

हे अवतारवाणीतील शब्द आज आचरणात आणल्यामुळे अनेकांची जीवनबाग फुलत आहे, बहरत आहे. सेवेचे महत्व हे सदगुरु कृपेमुळेच समजते. सेवा हे एक स्वाभाविक कर्म आहे.

खरं तर बाबाजींच्या वचनानुसार सेवा करणे हेच हितावह ठरते. धनाच्या सेवेने समाधान का ? तर माझ्या कष्टाच्या कमाईतील थोडासा भाग का होईना, माझ्या सदगुरुच्या सेवेत पडला. मनाने सेवा केल्यास मन प्रफुल्लित राहील. मन नेहमी निराकाराशी जोडून राहील. तीच गोष्ट आमच्या तनाची. खरं तर आमचं तन(शरीर) हे पंचभौतिक तत्वांपासून बनलेले आहे. या सृष्टीमध्ये ही पाच तत्व विराजमान आहेत. एक तत्व जरी कमी-जास्त झाले तरी शरीर बिघडते. शेवटी तन हे मातीचेच ना! आता जर कोणी म्हणू लागला की, मी तारुण्यात खूप सेवा केली आहे. माझे तारुण्य तसेच राहायला हवे, तर ते शक्य आहे का ? निसर्गाचा नियम आहे की, हे चक्र चालूच राहणार. तनाने देखील निष्काम सेवा केल्याने समाधानच मिळणार. चला भगवंत कृपेने मिळालेल्या या तनाचा कोणासाठी तरी उपयोग झाला.

सदगुरु दरबारी केलेली निष्काम-निरिच्छित सेवा मनास विशालता, नम्रता, प्रेम आणि सद्भावना प्राप्त करुन देते. अशा सेवादार गुरुभक्तांना दातार धन-मान-इभ्रत-यश आणि अमर पदवी प्रदान करतो. ज्या परिवारात महापुरुषांची सेवा होत राहते, तेथील सदस्यांची भावनाही तप आणि त्यागाची बनून जाते आणि मग अशा ब्रह्मज्ञानीयांचं घर म्हणजे पृथ्वीवरील सर्वोत्कृष्ट मंदिर बनून जाते. सदगुरु सेवेने रंकाचा राव बनतो. सदगुरु चरणी काया-वाचा-मने समर्पित होऊन भरभरुन सेवा करावी. कारण गुरु ही धर्माची शेती आहे. त्यामुळे बीज पेरताना हयगय करु नये.

गणेश आत्माराम घरत
उरण, रायगड

अहंकाराचा रोग

"मी आहे म्हणून तर हे काम होत आहे. जर मी करणारच नाही, तर मग हे काम होईलच कसे ?" काही दिवसापूर्वी असा भाव मनात उत्पन्न झाला आणि एके दिवशी तो तोंडातून बाहेर पडलाही. हा भाव ऐकणाऱ्यानेही माझा अहंकार आणखी वाढवण्यासाठी आपला सहयोग देताना म्हटले की, ' होय तर, सर्व काही करणारे आपणच आहात. जर आपण नसता, तर इतकं सर्व काही करण्याची कोणाची हिंमत आहे का ?'

आज जेव्हा हा भाव गुरुमताच्या कसोटीवर पारखून पाहतो तेव्हा जाणीव होते की, माझा किती मोठा गैरसमज झाला होता. जसं त्या बल्बला आपल्या प्रकाशाबद्दल गर्व होतो की, मीच सर्व जगाला प्रकाशमान करत आहे; परंतु जग तर विजेमुळे प्रकाशमान होत असतं. कितीही मोठा प्रयत्न केला तरी बल्ब स्वत: कधीही प्रकाश निर्माण करु शकत नाही. बल्ब फक्त एक साधन आहे म्हणून साधनानं कधीही अहंकार करण्याची गरज नाही. एक बल्ब नसला तर दुसरा बल्ब आणला जातो, तरीही त्याला घरी कोणी सांभाळून ठेवतं का ? नाही. त्याचं कार्य संपलं की, बिचाऱ्याच्या नशिबी कचऱ्याची पेटी असते. खरोखर माणूस जे काही काम करतो, ते काम करुन घेण्याची शक्ती निराकार प्रभुची असते. किती विलक्षण गोष्ट आहे की, निराकार प्रभू सर्व काही कर्ता करविता असूनही मौन आहे, परंतु माणूस मात्र विनाकारण खोटा अहंकार बाळगून आहे.

हे अटळ सत्य ज्या दिवशी मी सकाळी आंघोळ करत होतो, तेव्हा उलगडलं. आंघोळ करताना जेव्हा मी बादलीतील पाण्यात हात घातला तेव्हा मला जाणीव झाली की, जणू काही माझ्या हाताने पाण्यात कायम (स्थिर) जागा करुन घेतलीय; परंतु पाण्यातून हात बाहेर काढताच ती जागा अदृश्य झाली. सूक्ष्म दृष्टीने पाहिलं, तर पाण्यात माझ्या हाताच्या अस्तित्वाचं स्थिर चिन्ह दिसलंच नाही उलट ती जागा पाण्यानेच भरलेली होती. ठीक याप्रमाणेच हे जग पाण्याने भरलेल्या बादलीसारखं आहे आणि माझा हात म्हणजे मी स्वत: आहे. जोपर्यंत आहे तोपर्यंत माझं अस्तित्व असल्याच्या गैरसमजुतीत आहे, परंतु आपल्या जागेपासून बाजूला होताच माझं अस्तित्व अदृश्य झालं. याबाबत सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज म्हणतात, **"करवतीने लाकूड कापले जाते. लाकूड कापताना त्यातून भुसा बाहेर पडतो. आता करवत चालवली जातेय, लाकूड कापले जातेय आणि लाकडातून भुसा बाहेर पडतोय. अशावेळी करवतीतून भुसा बाहेर पडतोय असा जर कोणी विचार करत असेल, तर त्याची ती चूक आहे. याप्रमाणे संत देखील मानतात की, भले मग कर्म माझ्याकडून होत आहे असं वाटतही असेल, पण वास्तविक ते करणारा मात्र प्रभू परमात्माच आहे. म्हणून या निष्काम भावनेनेच ते ही जीवनयात्रा व्यतीत करत जातात."**

एक मनुष्य पर्वताच्या शिखरावर पोहचला आहे. आता त्याच्याजवळ दोन विकल्प आहेत... एकतर पुढे तरी जावं नाहीतर मागेतरी यावं. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यानं पुढे जावं किंवा मागे यावं या दोन्ही अवस्थेत कोसळणेच कोसळणे (अध:पात) आहे.

याप्रमाणेच ज्या क्षणी मानवात अहंकार प्रवेश करतो, त्यावेळी तो स्वत:ला शिखरावर असल्याचं समजतो. बस्स हा विचार मनात येताच अध:पतनाला (कोसळणे) सुरुवात होते. म्हणूनच संत-महापुरुष अहंकाराच्या भावनेपासून वाचण्याचा सल्ला देतात. रावण आणि दुर्योधन यांनी अहंकार बाळगला आणि त्यांचा समूळ विनाश झाला. हिरण्यकश्यपुने अहंकार केला आणि भगवान नरसिंहाच्या हातून मारला गेला. आजपर्यंत अहंकारानं कोणाचं भलं झालं आहे, तर माझं होईल.

गर्दन झुका कर चलने में, खतरा नहीं रहता ठोकर का।
मुँह के बल गिरते हैं वो ही, जो तान के सीना चलते हैं।

हृदयाच्या गाभाऱ्यातून वारंवार हीच प्रार्थना निघते की, हे प्रभू! अहंकार नावाचा रोग माझ्या पासून दूर राहो हीच कृपा कर. अहंकार असेल, तर भक्ती कशी होईल ? सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज देखील समजवतात, **अभिमान आपल्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा आहे. त्रासाचं हेच खरं कारण आहे. अभिमान-अहंकाराचा त्याग केल्यानेच भक्तीचा आनंद घेऊ शकतो.** (गुरुदेव हरदेव भाग २,पान १३२)

श्री. विकास अरोरा (रेवाडी, हरियाणा)

श्री गुरुवचनामृत

रविवार दिनांक १७ ऑक्टोबर २०१० रोजी समागम मैदान नं.२, बुराडी रोड, दिल्ली येथे आयोजित सत्संग समारोह प्रसंगी एकत्रित विशाल मानव परिवाराला संबोधित करताना सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी केलेल्या प्रवचनामृताचा मराठी अनुवाद

संतनांनो,

प्रेमाने बोला, धन निरंकारजी!

संतजनांनो, या सत्संगात आपण सर्वजण उपस्थित होऊन या निराकार दाताराशी आपली मनोवृत्ती जोडून भक्तिपूर्ण अशी प्रेरणादायक वचनं श्रवण करत होता, जी आपल्याला सत्संगातून प्राप्त होतात. महापुरुष-भक्तांकडून अशी प्रेरणा दिल्यानेच भक्त प्रेरित आणि उत्साहित होतात. भाव तर अगोदर असतातही, परंतु महापुरुषांची अशी प्रेरणादायक वचनं आपल्या उत्साहाला

आणखीनच वाढवतात आणि मग आपण असे महान योगदान देतो. असे भाव बाळगूनच महापुरुष-भक्तजन एक-दुसऱ्यासाठी साधन बनतात आणि एक-दुसऱ्यासाठी प्रेरित होतात. एक-दुसऱ्याची तल्लीनता पाहतात, जणू काही शुध्दच हरपलीय. तन-मनपूर्वक भरपूर सेवा करताना लागलेली उत्कंठा जेव्हा दुसऱ्यांकडून पाहतो, तेव्हा आपल्याही मनात आणखी अधिक उत्साह उत्पन्न होतो. एक तर वचनांनी प्रेरित केलं जाणं आणि दुसरं म्हणजे कर्म आणि सेवेच्या क्षेत्रात खरोखरच अशी योगदानं देताना जेव्हा भक्त-महापुरुषांना पाहतो तेव्हा अशी इच्छा आमच्याही मनात आणखीनच उत्पन्न होते. जो एक दिवस जेव्हा संपतो तेव्हा त्याचं झालेलं रुपांतर आपण पाहतो की, या मैदानांमध्ये जेव्हा सकाळी येणं होतं तर कधी दुपारी; तेव्हा असं होत नाही की आज इतके भक्त सेवा करत आहेत आणि उद्याला काही कमी झाले आहेत उलट प्रत्येक दिवशी यात वाढ झालेली दिसतेय म्हणजेच हे सेवा करताना किती आनंद घेत आहेत हाच त्याचा अर्थ होतो. भलेही त्यांना इतक्या दुर्गंधमय आणि घाणीने भरलेल्या चिखलदार पाण्यात उतरावं लागतं, तरीही त्यात उतरुन किती आनंद घेत आहेत, त्या चिखलात नाचतही आहेत. वातावरणातही असा कोणता गारठा नाही. आताही निम्मा ऑक्टोबर महिना निघून गेला आहे, तरीही उकाड्याची जाणीव होतेय. तर असा हा भरपूर तापदायक उकाडा असूनही कशाप्रकारे दिवसभर दिल्ली सेक्टरच्या साधसंगतही येत आहेत आणि अनेक प्रांतातून सेवादलचे नवजवान तसेच साधसंगतही येत आहेत. गाडीतून जेव्हा जिथे जिथे जावं लागतं तेव्हा एका मैदानातील एखाद्या भागात गेल्यास गढवाली भाषेतील गाणी ऐकायला मिळतात, दुसऱ्या भागात गेल्यास राजस्थानी भाषेतील गाणी ऐकू येऊ लागतात आणि दुसऱ्या मैदानावर गेल्यानंतर तिथे पंजाबी गाणी ऐकायला मिळतात. सांगण्याचा भावार्थ हाच की, त्या ज्या भाषा बदलत जातात म्हणजेच गढवाल, कुमाऊँ, राजस्थान इत्यादी कुठून-कुठून आलेले भक्तजन या मैदानांमध्ये सेवा करत असतात. माहीत नाही की, आगामी दिवसात तेलुगू किंवा आणखी कोणकोणत्या भाषा ऐकायला मिळतील. आताही आपण पाहातच आहात की, सर्वत्र प्रवेशद्वारं उभी करण्यासाठी मराठी भाषिक गुंतलेले आहेत, तेव्हा या काही दिवसात आपल्याला मराठी भाषाही ऐकू येतेय. ज्यासाठी इतकी तयारी केली जातेय त्या प्रसंगी अशी कोणतीही भाषा नाही जी आपल्याला ऐकायला मिळत नसेल. जेथे देशाच्या प्रत्येक विभागातून महात्मा-महापुरुष याठिकाणी येतील तेथे प्रत्येक भाषा आणि प्रत्येक प्रांतीयांनी कशाप्रकारे या मिशनचा स्वीकार केला आहे याची जाणीव आपल्याला होईल. हे सत्य, ही जागृती, हा बोध कशाप्रकारे संस्कृती आणि भाषांच्या अगदी पलीकडे आहे हे प्रत्येक संस्कृतीच्या लोकांनी मानले आहे आणि अशाप्रकारे माणुसकीला किती उच्च दर्जा प्राप्त होतो, त्याच्या महत्त्वाची जाणीवही होते. तर समागमसाठी हे प्रयास प्रबंधक करत आहेत, विविध योजना बनवून मांडणीही करत आहेत आणि सेवादलचे नवजवान, अधिकारीही सेवेत गुंतले आहेत. या महान कार्यासाठी साधसंगतही सेवारत झाली आहे, तर अशी महान योगदानं निरंतर दिली जात आहेत. सेवेचं महत्त्व किती आहे हे भक्त खरोखरच जाणतो म्हणून सेवेच्या अंगाला तो कधी दुर्बळ होऊ देत नाही, त्याला दृढता देत जातो. सेवेची किती रुपं आहेत. जेथे तन-मन-धनाच्या सेवांचं रुप आहे तेथे देशाच्या अखंडतेसाठी देशाचे रहिवासी कशाप्रकारे देशाचीही सेवा करत आहेत. देशाला मजबूती देण्यासाठी देश-सेवेत आपले तरुण अनेक सैन्यदलात कार्यरत आहेत, कोणी इतर संरक्षण दलात आहेत. आणखी कितीतरी खाती (विभाग) आहेत, ज्यांच्या मार्फत देशाचं संचालन होत आहे. तर

किती किती रुपात देशाची सेवा केली जातेय. आपण महापुरुष कर्मयोगी आहात. देशाच्या सेवेप्रति देखील आपण सावध राहता याची आपणास जाणीव आहे. जसं काही दिवसांपूर्वी आपणास हे सूचित करण्यात आलं होतं की, ज्या राष्ट्रकुल स्पर्धा दिल्लीत आयोजित केल्या होत्या तो काळ निघून गेला आहे. तर देशासाठी अशा आयोजनांचं महत्त्व असतं, जिथे सर्वांची आंतरराष्ट्रीय दृष्टी लागते आणि प्रत्येक महत्त्वपूर्ण घटनेचा पाठपुरावा केला जातो तो वैश्विक दृष्टिकोनातून की, या क्रीडा जगतात काय होत आहे आणि जे आयोजन आहे ते कशाप्रकारे पार पाडलं जात आहे. आपण पाहिलंत की, जिथे *Agency* ठेवण्यात आल्या होत्या त्या यशस्वी करण्यासाठी तेथे मिशन कडूनही *prior to the games* योगदान देण्यात आले आणि खेळांच्या दरम्यानही योगदान दिले. विशेषकरुन खेळांच्या दरम्यान आपल्या सेवादलच्या ट्रॅफिक विंगच्या सुमारे ६५० महापुरुषांनी ट्रॅफिकचं कशाप्रकारे संचालन केलं. जितकी महत्त्वपूर्ण स्टेडिमय; मग जवाहरलाल नेहरु स्टेडियम किंवा जवळपासची स्टेडियम असोत, तेथे जास्तकरुन जे जवान नजरेस पडले ते सेवादलचे नवजवान होते; ज्यांनी गणवेष परिधान करुन तेथे संचालन केले. ट्रॅफिक पोलीसचे अधिकारी असोत किंवा जवान; ते स्वतः प्रशंसा करत होते की, यांनी फक्त आमच्यासाठी हातच पुढे केला नाही तर या ठिकाणी कोणताही अडथळा होऊ नये म्हणून सर्व जबाबदारी सांभाळली. मागे तीन-चार दिवसापूर्वी एफ.एम. चॅनेल आणि त्या चॅनेलचे आर.जे. किंवा रिपोर्टर का असेनात, ते त्या (सेवादल) जवानांची आणि दिल्ली ट्रॅफिक पोलीस जवानांची मुलाखत घेत आहेत हे मीडियानेही पाहिलं. तर तेही प्रशंसा करत होते की, खरोखरच अशा काही संघटना आहेत ज्या हे जे सर्व काही देशाचं आहे ते आपलंच आहे असं मानतात आणि त्यासाठी किती योगदान दिले जात आहे. दुसरीकडे ती एक अंधःकारमय बाजू आहे जी देशाचं शोषण करण्यात गुंतली आहे, देशाची पिळवणूक करत आहे, लुटून काढत आहे आणि इकडे जे निष्काम सेवा करत आहेत त्या जवानांना विचारलं जात आहे की, १०-१२ दिवस या ठिकाणी दिवसभर ट्रॅफिकचं संचालन करत आहात तर सरकारकडून आपल्याला किती मिळालं आहे? तेव्हा ते म्हणतात, एक पै देखील आम्ही घेतली नाही उलट मिशनकडून येथे पाणी पोचवलं जात आहे. आम्ही मिशनशी जोडलेलो आहोत म्हणून फक्त आमच्यापर्यंत पाणी पोचवलं जात आहे किंवा काही खाद्यपदार्थ पोचवले जात आहेत असं नाही, तर इथे जे दिल्ली पोलीसचे जवान आहेत त्यांच्या पर्यंतही पोचवलं जात आहे. अशाप्रकारे येथे कोणत्याही प्रकारचे शूल्क *(Fees)* आकारले जात नाही, येथे तर सेवाच केली जातेय. आजच्या जगात एखादाजण देशाप्रति अशी भावना बाळगू शकतो काय या विचाराने ते हैराण होत

असत. अशाप्रकारे सामाजिक आणि पारिवारिक रुपात देश प्रेम, देशाची सेवा, व्यापक रुपात सकल मानवतेची सेवा होतेय. इतिहासाच्या पानावर आपण श्रावण बाळाचं नाव ऐकतो. कशाप्रकारे तो आई-वडिलांची सेवा करत आहे, कशाप्रकारे अगतिक आई-वडिलांना घेऊन तो फिरत आहे. तर असे आहेत आई-वडिलांची सेवा करणारे आणि दुसरीकडे ते किळसवाणे दृश्य जिथे थोड्याशा पै-पैशासाठी, मालमत्तेसाठी आई-वडिलांना मारहाण करणारे. तर अशाप्रकारे एकीकडे हे एक उज्ज्वल स्वरुप आणि दुसरीकडे एक अंध:कारमय स्वरुप. सांगण्याचा भावार्थ म्हणजे देशाची सेवा असो, समाजाची सेवा असो, समस्त मानवतेची सेवा असो, मानवजातीची सेवा असो; सर्व जगाप्रति आपल्या कर्तव्यांची जाणीव ठेवतात. त्याच भावनेला निभावत जातात. समाज, देश, मानवता, मिशनसाठी कोणत्याही प्रकारची सेवा हे सर्वजण निष्काम भावनेने करतात. ही माझी अट आहे अशा अटी अगोदर ठेवत नाहीत. जसं जगात होत असतं की, ही माझी अट असून त्यानुसारच मी इतकं योगदान देईन. अगोदर अट ठेवली जाते की, जर हे मानत असाल तर मी करेन नाहीतर दुसरं दार ठोठावा; हे समाजात होत आहे, जगातही होत आहे. अशी वर्तणुक आहे समाजात आणि जगात, परंतु भक्त-महापुरुष-संतजन निष्काम-निस्वार्थी होऊन सेवा करतात. जसं सूफी संताची ती ओळ दास नेहमीच वाचतो...

बेगर्ज जिनां दी उल्फत ए
ओ नमाज दी किमत नहीं मंगदे।

ते प्रार्थनेचं (नमाज) मूल्य मागत नाहीत की, मी पाच वेळा वाचली, इतकी वर्षे मी वाचली म्हणून त्या मोबदल्यात कमीत कमी इतकी तरी मालमत्ता बनवून द्यावी किंवा बनावी किंवा बनली असती; असा काहीही विचार करत नाहीत. हे प्रार्थनेचं मूल्य मागत नाहीत आणि प्रार्थनेला व्यापारही मानत नाहीत. भक्तीला व्यापार बनवत नाहीत आणि सेवेलाही व्यापार बनवत नाहीत. हे तर इतकंच जाणतात की, जे काहीही होवो आणि जे काहीही मिळो ते तर सद्भाग्यच आहे. दातार तुझी कृपा आहे की, तू दिलेली देण तुझ्याच कामी येत आहे. तुझ्या कामी येण्याचा अर्थ म्हणजे तुझ्याच भक्तांच्या उपयोगी येत आहे. अशा भावनांनी युक्त भक्तजन जगासाठी सदोदित उदाहरणं कायम करत आहेत. आजही त्याच भावनांनी युक्त होऊन



भक्तजन-महापुरुष सेवा करत आहेत. जेथे निस्वार्थी भाव आहे तेथे निष्काम होऊन विनम्रतापूर्वक सेवा करत आहेत. ज्याप्रकारे येथे या मैदानांवर ही तनाची सेवा केली जातेय. किती धूळ आहे तरीही हे सुध्दा इतके विनम्र होतात की, आम्ही धुळी समान आहोत, आमचे योगदान धुळीसमान आहे, आमचं तर कोणतंही योगदान नाहीच. इतकं योगदान देऊनही असा भाव ठेवतात.

आज विजयादशमीचा दिवस जेथे दसऱ्याचा उत्सव साजरा केला जातोय. जे अहंकारी आहेत, जे अभिमानी आहेत, जे कठोर आहेत; प्रत्येक वर्षी त्यांच्या प्रतिमेचं दहन केलं जात आहे. इतिहासाच्या पानावरील श्रीरामाचा तो समय होता, जेव्हा ते शारीरिक रुपाने या जगात उपस्थित होते, तेव्हा त्यांच्याही समयी एक अंध:कारमय रुप होतं रावणाचं. त्याची भावंडं किंवा नातेवाईकांना किती हीन दर्जा मिळाला जेणेकरुन आजही त्यांच्या प्रतिमांचं दहन केलं जात आहे. रावणाचं, त्याच्या परिवाराचं, त्याच्या भावंडांचं एक अभिमानी रुप समोर आलं. अशाप्रकारे अभिमान करणारे, परमात्म्याला आव्हान देणारे, परमात्म्यालाही साधारण भक्त मानणारे आणि अत्याचार करणाऱ्यांच्या वाट्याला शेवटी आलं काय ? इतिहासातूनही आपल्याला माहीत झालं आहे की, अभिमान करणाऱ्यांची नव्हे तर हनुमानासारखी विनम्रता असलेलेच पूजले जात आहेत, त्यांचीच अर्चा होत आहे. राम हे तर रामच आहेत आणि हनुमान त्यांचे उपासक. रामाची भक्ती करणारे असूनही हनुमानाची किती अधिक पूजा केली जातेय, कारण त्यानं विनम्रता धारण केली, 'मी-मी' केले नाही. तर भक्तजनांचं हेच वैशिष्ट्य असतं की, मोठ्यात मोठं योगदान देतील तरीही हेच मानतील...

ना हम किया ना करेंगे ना कुछ किया शरीर।

जो कुछ किया सो हरि किया भयो कबीर कबीर।

अशाप्रकारे त्यांचे भाव आहेत. ते भाव इतर लोकांना वेगळे करुन दाखवत आहेत की हे भाव वेगळे आहेत, महत्त्व ठेवणारे आहेत. इतकं काही करुनही ते मात्र स्वत:ला लपवत आहेत. गुरसिखांच्या संदर्भात स्पष्ट रुपात म्हटलेली महापुरुषांची ती ओळ दास नेहमीच वाचतो की... 'गुरसिख आप गंवावे न आप गिणावे' म्हणजे गुरसिख स्वत:च स्वत:ला हरवून बसतो, स्वत:च स्वत:ची गणती करत बसत नाही. स्वत:ची गणती करण्याचा भावार्थ म्हणजे 'मी' ला समोर ठेवत नाही म्हणजेच मी आहे फक्त मी आहे, माझा उल्लेख, माझी चर्चा, माझं वर्णन, माझं नाव सर्वात पहिल्या रांगेत असावं, यादीत असावं अशाप्रकारची स्वत: गणती करत नाही, तर फक्त स्वत:लाच हरवून बसतो. स्वत:च स्वत:ला हरवून बसण्याचा भावार्थ म्हणजे मी तर काही नाहीच आहे, अखेर मी केलं तरी आहे काय? मी तर काहीही करणारा नाही...

ना हम किया ना करेंगे ना कुछ किया शरीर।
जो कुछ किया सो हरि किया भयो कबीर कबीर।

करणारा आणि करवून घेणारा तर हा हरि आहे. हा तर माझं नाव पुढे करत आहे. अशाप्रकारची भक्तांची भावना असते. हीच उत्तम भावना आहे आणि अशा उत्तम भावनांचं अनुकरण-अनुसरण करणेच समजुतदारपणा आहे, बुध्दिमत्ता आहे. जे असं करुन पुढे जातात, जे अशा रेषांवर चालू लागतात, असा भाव पाहून आणि असे कर्म पाहून स्वत:ला त्यावर समर्पित करत जातात आणि त्या रस्त्यावर मार्गक्रमण करतात अशा भक्त-महापुरुष-संतजनांची अशी समज, अशी महानता, सदोदित त्यांची चर्चा, त्यांची महिमा धर्मग्रंथात गाईली गेली आहे. आजही आपण सर्व भक्तजन-महापुरुष हे योगदान देत आहात. दातारनं कृपा करावी आणि असं योगदान देण्यासाठी सर्वांना शक्ती-सामर्थ्य द्यावं. आणखी अधिक सेवा करुन सर्वजण आनंद घेत जावोत. जे परोपकार या सेवांद्वारे होत आहेत, त्यातही जे योगदान दिले जात आहे; खरोखरच या जगावर असेच परोपकार होत राहावेत. जगाचा उध्दार होत जावा, अज्ञानाच्या झोपेतून सर्वजण जागे व्हावेत आणि त्यांना जागे करण्यासाठी परोपकार होत आहेत. अशाप्रकारे मानवता जी दुर्बळ होत चालली आहे आणि पुढे या मानवतेला दृढता देण्यासाठी जे परोपकार केले जात आहेत, ते परोपकार प्रभावी ठरावेत अशी दातारनं कृपा करावी. जगातील मानवमात्राला सुमती मिळावी, जागृती मिळावी आणि सर्वजण मानवतेच्या महामार्गावर चालावेत. या जगाला स्वर्ग बनविण्यासाठी योगदान द्यावे आणि सुखासह सर्वांनी या जगाची यात्रा संपन्न करावी. हीच शुभकामना, हीच प्रार्थना, हीच अरदास. तेव्हा दास आणखी अधिक वेळ न घेता याच शब्दांच्या माध्यमातून आपली अनुज्ञा मागत आहे.

संतजनांनो, धन निरंकार.

मराठी अनुवाद : श्री. जगन्नाथ चैतन्य मडकर
(मुंबई)



जीवन संजीवनी

अमृतफळ... आवळा

आयुर्वेदात आवळा या फळास 'अमृतफळ' म्हटलेले आहे. रसायन द्रव्यांमध्ये सर्वश्रेष्ठ आणि सर्व औषधांमध्ये सर्वोत्तम म्हणून आवळा या फळाचा उल्लेख केला जातो. ऋतू कोणताही असो, आवळा सर्व ठिकाणी आणि सर्वांसाठी लाभदायक आहे. इतकेच नव्हे, तर चिरतारुण्य आणि दीर्घायुष्य प्रदान करणारा म्हणून आवळ्याची महती आहे.

आवळा हा 'क' जीवनसत्वाचा राजा असे म्हटले गेले आहे. त्यामुळे आवळ्यात बरेच संरक्षक गुणधर्म आहेत. आवळा शरीराला जिवाणूंच्या आक्रमणापासून वाचवतो, शारीरिक विकासात येणारा अडथळा दूर करतो, यकृताचे कार्य सुरळीतपणे चालविण्यास मदत करतो, जीवनशक्ती वाढवतो तसेच दात आणि हिरड्या आयुष्यभर मजबूत बनवून ठेवतो.

स्वादिष्ट आणि पुष्टिदायक आवळा पाक

गुण आणि उपयोग :

हा आवळा पाक अर्थात् हलवा अत्यंत स्वादिष्ट, पुष्टिदायक आणि उत्तम पित्तशामक आहे. हा सप्तधातूंची वृध्दी करुन शरीराला बलवान आणि वीर्यवान बनवतो. याच्या सेवनाने डोळ्यांची जळजळ, आंतरिक उष्णता, डोकेदुखी, उच्च रक्तदाब, रक्त आणि त्वचेचे विकार, मूत्र आणि वीर्य संबंधी विकार इत्यादी पित्तजन्य विकार नष्ट होतात. हा एक अत्यंत सुलभ, स्वस्त आणि गुणकारी प्रयोग आहे.

सामग्री :

एक किलो ताजे पिकलेले रसदार आवळे, एक किलो साखर किंवा खडीसाखर, शंभर ग्रॅम तूप, २५ ग्रॅम चारोळी, १० ग्रॅम लहान किंवा मोठी वेलची.

कृती :

कुकरमध्ये आवळे आणि अर्धी वाटी पाणी टाकून उकडून घ्यावेत. उकडलेल्या आवळ्यातून बिया काढून आवळ्यांचा गर वेगळा करावा. जोपर्यंत पाण्याचा अंश पूर्णत: जळून जात नाही तोपर्यंत आवळ्याचा गर तुपात परतावा. पाण्याचे बाष्प (वाफ) झाल्यावर गरातून तूप बाहेर येऊ लागते. नंतर यात खडीसाखर किंवा साखर मिसळून हे मिश्रण हालवत रहावे. मिश्रण हलव्यासारखे घट्ट झाल्यावर आचेवरुन उतरवून त्यात वेलची पूड आणि चारोळ्या टाकाव्यात.

सेवन करण्याचे प्रमाण : सकाळी दोन चमचे.

दक्षता बाळगणे :

आवळा पाकाच्या सेवनानंतर दोन तास दूध पिऊ नये. चटणी, मुरंबा वगैरे रुपातही आवळ्याचे सेवन करुन लाभ घेऊ शकता.

आवळ्याचे औषधी प्रयोग

नवशक्तीची प्राप्ती : एक महिनाभर नियमितपणे आवळ्याच्या चुर्णात तूप, मध आणि तिळाचे चूर्ण मिसळून सेवन केल्यास मनुष्याच्या वाक्शक्तीचा (बोलण्याची शक्ती) विकास होतो, शरीर कांतिमान होते तसेच चिरतारुण्य लाभते.

इंद्रियांच्या कार्यक्षमतेचा विकास : आवळ्याचे चूर्ण पाणी, तूप किंवा मधाबरोबर घेतल्याने पचनशक्ती वाढते. कान, नाक, डोळे यांच्या कार्यक्षमतेचा विकास होतो आणि दीर्घायुष्य लाभते.

मजबूत हृदयासाठी : आवळ्याचे चूर्ण आणि खडीसाखर समप्रमाणात एक-एक चमचा घेऊन

सकाळ-संध्याकाळ सेवन केल्याने हृदय मजबूत होते. हृदयाचे वॉल्व सुरळीतपणे कार्य करतात. हृदयविकाराच्या रुग्णांनी हा प्रयोग कमीत कमी वर्षभर तरी नियमित केला पाहिजे.

काळ्याभोर-दाट-रेशमी केसांसाठी : २० ते ४० ग्रॅम सुकलेले आवळे २०० ग्रॅम पाण्यात रात्री भिजत घालावेत आणि त्या पाण्याने सकाळी केस धुवावेत. आवळा आणि खडीसाखरेचे सम प्रमाणातील चूर्ण पाण्यासोबत घ्यावे. या प्रयोगाने केसांच्या सर्व तक्रारी बंद होतील आणि केस चमकदार दिसू लागतील.

उच्च रक्तदाब (हाय ब्लडप्रेशर) : सहा महिने दररोज सकाळी अनशापोटी आवळ्याचा मुरंबा खाल्ल्याने लाभ होतो.

सर्व प्रकारचे यकृत विकार : २५ ते ३५ ग्रॅम ताज्या आवळ्यांचा रस किंवा सुकलेल्या आवळ्यांचे ५ ग्रॅम चूर्ण सेवन केल्याने यकृताचे दोष दूर होतात.

अजीर्ण : आवळ्याचे चूर्ण आणि खडीसाखरेचे समप्रमाणातील मिश्रण बनवून जेवणानंतर एक चमचा सकाळ-सायंकाळ सेवन केल्याने अजीर्ण आणि मलावरोधाची तक्रार दूर होते.

पोटातील जंत : सहा चमचे ताज्या आवळ्यांचा रस आणि एक चमचा शुध्द मध मिसळून आठवडाभर सकाळ-संध्याकाळ घ्यावे. यामुळे जंत निश्चितच मलासह बाहेर पडतात.

पोटाचे सर्व विकार : आवळा चूर्णाचे गोमूत्रासह सेवन केल्याने पोटाच्या जवळजवळ सर्वच विकारांमध्ये लाभ होतो.

तेज आणि मेधाशक्तीचा विकास : आवळ्याचे चूर्ण तुपाबरोबर दररोज घेतल्याने शरीरात तेज आणि मेधाशक्तीचा विकास होतो.

गरोदर स्त्रियांसाठी : सकाळी अनशापोटी गरोदर स्त्रीला दररोज २ मोरावळे खाऊ घातल्यास प्रसुती नैसर्गिकरित्या कोणत्याही औषधाविना आणि चिकित्सकीय मदतीविना होते. बाळाची रोगप्रतिकारक क्षमता वाढलेली आढळून येते आणि त्यामुळे बाळ ओजस्वी आणि सुंदर होते.

आयुर्वेद म्हणजे वैद्यशास्त्र. प्राचीन ग्रंथ-शास्त्रांच्या आधारानुसार आयुर्वेद अर्थात् वैद्यशास्त्राचे जनक म्हणून प्राचीन ऋषी-मुनींचा उल्लेख केला जातो. ऋषी-मुनींनी आध्यात्मिक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून मानवाचं जीवन सात्विक रहावं म्हणून वनस्पतीजन्य पदार्थांच्या माध्यमातून आयुर्वेदीक औषधांचा शोध लावला. म्हणून आध्यात्मिक दृष्टिकोन असा आहे की, दीर्घायुष्य म्हणजे पन्नाश ऐवजी शंभर वर्षाचे आयुष्य होणे असे नव्हे, तर जन्मदात्या परमात्म्याने जितके आयुष्य दिले आहे ते आरोग्यमय म्हणजे रोगरहित जीवन जगणे. चिरतारुण्य म्हणजे सदाबहार (Evergreen) असाही अर्थ होतो. ■

सद्‌गुरु सारीखा असता पाठीराखा

मुंबई पोलीस दलात सद्‌गुरु कृपेने दास पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत आहे. सन २००० मध्ये पोलीस उप-निरीक्षक पदाची परीक्षा घेण्यात येणार होती. या परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी भायखळा येथील लायब्ररीत जात असे. महात्मा सकपाळजी (सध्या पोलीस अधिकारी) आणि इतर काही अधिकारीही त्यावेळी दासबरोबर अभ्यास करायचे. त्यावेळी लायब्ररीत अत्यंत शांत स्वभावाची एक व्यक्ती अभ्यास करताना दिसायची. अधिक विचारपूस केल्यानंतर समजले की, ती व्यक्ती म्हणजे श्री. ललितकुमार दळवी. (उल्हासनगर क्षेत्राचे क्षेत्रीय संचालक) अशातऱ्हेने महात्मा श्री. दळवीजी यांचं पावन सान्निध्य दासला मिळालं. खरं तर यापूर्वीच १९९९ मध्ये डिलाईलरोड येथील सत्संगात महात्मा छगन पांचाळजींकडून दासला ब्रह्मज्ञानाची प्राप्ती झाली होती. महात्मा ललित दळवीजींचे सान्निध्य लाभल्याने दुग्धशर्करा योग जमून आला. सद्‌गुरुवर दृढविश्वास कसा ठेवायचा हे संतांचे निरनिराळे दाखले देऊन ते सांगत. त्यांनी सांगितलेला सद्‌गुरु महिमा आणि सद्‌गुरुवरील आमचा दृढविश्वास यामुळे आम्ही सर्वजण पोलीस अधिकारी म्हणून उत्तीर्ण झालो.

सन २००९ मध्ये वर्सोवा पोलीस ठाण्यात सेवारत असताना दासला एका बिकट प्रसंगाला सामोरं जावं लागलं. सद्‌गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या असीम कृपेने या प्रसंगातून दास सहीसलामत निभावून निघाला आणि **'सद्‌गुरु सारीखा असता पाठीराखा'** या संत उक्तीचाही प्रत्यय आला. आजही ती घटना डोळयासमोर तरळतेय. एप्रिल २००९ मध्ये श्री. पोतदार यांनी बोगस डॉक्टर मुनीर खान विरुध्द दिलेल्या लेखी तक्रारीवरुन कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आणि त्याची एक प्रत (एफ.आय.आर.) त्यांना दिली. त्यांनी पोलीस ठाण्याच्या गेटवर जाऊन त्या प्रतिच्या झेरॉक्स काढल्या आणि फोनवरुन आपल्या वकिलाशी संपर्क साधून गुन्हा नोंदविल्याचे सांगितले. त्यानंतर पुन्हा येऊन फिर्यादीने त्या प्रतिवर काही भादविसह कलमं समाविष्ट करणे तसेच बोगस प्रमाणपत्र क्र.५७६ ची नोंद करणे बाकी असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसभा निवडणूकीच्या बंदोबस्ताची धावपळ असल्याने दासने त्यांना सांगितले की, तुम्ही उद्या या आणि तुमचा पुरवणी जबाब नोंदवून गुन्ह्यामध्ये जी भादवि कलमं समाविष्ट करायची आहेत ती करुन देतो. मला ३/४ दिवस येता येणार नाही आणि संगणकावर जबानी नोंदविली असल्याने तीच पुन्हा एफ.आय.आर. प्रतिवर उतरुन द्या असं फिर्यादी सांगू लागले. शेवटी नाईलाजाने त्याच गुन्ह्याची बदललेली दुसरी प्रत उतरुन त्यांना देऊन अगोदर दिलेली पहिली प्रत परत घेतली, परंतु पहिल्या प्रतिच्या झेरॉक्स मात्र फिर्यादीकडेच राहिल्या. बदललेल्या एफ.आय.आर.ची प्रत मा. महानगर दंडाधिकारी, रेल्वे मोबाईल न्यायालय(अंधेरी) यांना सादर केली.

फिर्यादी श्री. पोतदार यांनी पहिल्या एफआयआरची (झेरॉक्स) प्रत सत्र न्यायालयात सादर केली. फिर्यादीच्या चुकीमुळे एकाच गुन्ह्याचे दोन एफआयआर झाले. आरोपी डॉ. मुनीर खान यांनी आपल्याविरुध्द खोटा गुन्हा नोंद केल्याबद्दल उच्च न्यायालयात रिटपिटीशन दाखल केले. बोगस डॉ. मुनीर खान असाध्य रोगांवर उपचार करण्यासाठी मधाची एक बाटली भरमसाठ किंमतीला विकून असहाय्य पीडितांना लुटत असल्याने तसेच त्याची प्रमाणपत्र बोगस असल्याने महाराष्ट्रात त्याला वैद्यकीय धंदा करण्याचा कोणताही अधिकार नाही आणि फिर्यादीच्या

(पान २७ वर)

सेवा - गुरुभक्तीचं एक अंग

जीवनामध्ये माणूस या संकल्पने आधारे जीवन जगायचे असेल तर प्रेम, नम्रता, बंधुता, समता या अनिवार्य सदगुणांसह सेवा या मूलभूत अंगाचा समावेश असणे आवश्यक आहे. संत निरंकारी मंडळामध्ये ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर प्रत्येक जिज्ञासूला जीवनात सत्संग, सेवा, स्मरण या कर्माची पूर्तता करण्यास सांगितले जाते; कारण ईश्वरभक्ती किंवा गुरुभक्तीत अशा गोष्टींची महत्ता आहे.

सेवा (Service) या शब्दाची निश्चित अशी व्याख्या नाही. प्रत्येक प्रवर्गानुसार व्याख्या बदलते. मग ती धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक किंवा आध्यात्मिक स्वरुपाची असेल. त्याच्या क्षेत्रानुसार सेवेची व्याख्या तयार करता येईल. सेवा ही तन, मन व धन यांच्या माध्यमातून करता येते. तन म्हणजे शरीर. शारीरिक सेवा, सत्संगाला जाणे, संतजनांच्या कामात हातभार लावणे, मदत करणे या द्वारे होणारी सेवा म्हणजे तन सेवा. मानवी मन हे अत्यंत चंचल असे अवयव आहे. परंतु गुरुभक्तीमध्ये मनाला नियंत्रित करता येते. मग अशा नियंत्रित मनाद्वारे कोणतीही सेवा होऊ शकते. यावर सदगुरु बाबाजी आपल्या विचारात सांगतात की, if our Thoughts are pure, our Action are pure. जर आपल्या विचारात शुध्दता असेल तर, आपल्या कृतीत शुध्दता असते. विचार हे मनातून येतात. बाबा गुरबचनसिंहजी महाराज सुध्दा आपल्या विचारात म्हणायचे की, **'यदी हम किसी की निंदा नही कर रहे है, या हम किसी की प्रशंसा कर रहे है, या अच्छाई ढुंढ रहे है तो वो मन की सेवा!'** कधी-कधी आपल्याला आजारी गुरुभक्ताला भेटण्याचा योग येतो. अशावेळी भक्ताकडे पाहून आपल्या मनातून सदगुरुकडे गुरुभक्तासाठी प्रार्थना केली पाहिजे. अशी पावन, पवित्र आणि शुध्द सेवा गुरुला नेहमी स्वीकार असते. आपल्या पूर्ण कमाईचा दहावा भाग हा गुरुचा असतो. धनसेवा ही विविध प्रकारे करता येते. संत निरंकारी मंडळामध्ये समागम सेवा, नमस्कार सेवा, बिल्डिंग फंड तसेच वेल्फेअर फंड अशाप्रकारे धनाची सेवा करण्यात येते आणि अशीच सढळ हाताने व निःस्वार्थीपणाने केलेल्या सेवेचा सदगुरु नेहमी स्वीकार करतो.

सेवा ही निस्वार्थी, निष्काम असावी. ती निर्मल, पवित्र भावनेने केली गेली पाहिजे. भक्तीत सेवा करताना असा भाव बनला पाहिजे की, सदगुरु सेवा करवून घेत आहे. गुरुच्या आदेशावर स्वतःला समर्पित करणे म्हणजे सेवा. गुरुभक्तीमध्ये आपण सेवा किती केली यापेक्षा कशी केली याला महत्व असते. सेवेत कधीही दिखाऊपणा नसावा. महात्मा गांधी यांनी लिहिलं आहे की, "The Best way to find yourself is to lose yourself in the service of others." इतरांच्या सेवेत हरवून जाणे हाच स्वतःला शोधण्याचा उत्तम मार्ग आहे. सेवा करणे हा वास्तविक मनःशांतीचा मार्ग आहे. सेवा हे एक असे आध्यात्मिक शस्त्र आहे की, त्याआधारे आपण जीवनामध्ये आनंदच आनंद आणू शकतो; परंतु तो नसेल तर हे जीवन नुसते कोमेजलेली फुलं असणार आहे. जसे म्हटलं जातं की, पायदळी चुरगळलेली फुले चुरगळणाऱ्या पायांना सुगंध अर्पण करतात. खरं तर सेवा धर्माचे हेच कार्य आहे. जसे हेलन केलर (Helen Keller) या इंग्रजी साहित्यिकाने लिहिले आहे की, Happiness cannot come from without, it must come from within. It is not what we see and touch or that which others do for us which makes us happy; it is that which we think and feel and do, first for the other fellow, and then for ourselves. अर्थात आनंद ही अवस्था मना बाहेरुन येत नाही तर ती मनातून येते. सेवा ही एक जलद कृती आहे. आध्यात्मिक जीवनात ही कृती जलदपणे, तर सामाजिक जीवनामध्ये सेवा सावकाशपणे होते. समाजात काही माणसं अशी असतात की, एखादे कृत्य

केल्यानंतर त्या सेवेचे मूल्य मिळाले पाहिजे तसेच त्याचे credit मिळाले पाहिजे. परंतु आध्यात्मिक जीवनात सेवा करणे हे केवळ क्षणांचा खेळ असतो. कारण समाजामध्ये काही कर्तव्ये असतात. त्यानुसार अधिकार व नंतर मागणी असते. ईश्वरभक्तीत अशा काहीच गोष्टी नसतात; असते ती फक्त चाकरी, नम्रभाव. हीच गुरुभक्तातील श्रेष्ठ गुरुभक्त होण्याची महत्वाची पायरी आहे.

आज या कलियुगामध्ये माणूस सेवाधर्म विसरुन गेला आहे. संत निरंकारी मंडळाचे प्रमुख सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज संत समागमाच्या माध्यमातून माणसाला सेवाधर्माची आठवण करुन गुरुभक्तीत गुरुभक्तवालं जीवन जगण्याची कला शिकवीत आहेत जेणेकरुन या भूतलावरती विश्वबंधुतेचा, सेवेचा आणि आनंदीपणाचा दीप सदैव तेवत राहील.

रविंद्र गौऱ्या पेरवे
श्रीवर्धन-रायगड

(पान २५ वरुन)

सांगण्यावरुन एफआयआर मध्ये बदल करावा लागला व न्यायाच्या दृष्टीने तो बदल करणे गरजेचे होते हे दासचे म्हणणे सुनावणीच्या पहिल्या तारखेला न्यायमूर्ती, आरोपीचे वकील, सरकारी अभियोक्ता ऐकून घेत नव्हते आणि दासच्या विरोधातच बोलत होते.

वास्तविक दासची चूक नसतानाही न्यायालयात कोणीही ऐकून घेत नव्हते. दासला मोठी सजा (निलंबित वगैरे) होणार असं सर्वांना वाटलं. दासची अवस्था तर वाईट झाली होती. अशावेळी **'सद्गुरुवाचोनी सापडेना सोय'** असं दास ध्यानीमनी ठेवत असे. सदगुरुकृपेने महात्मा सकपाळजी (पोलीस अधिकारी) यांची भेट झाली आणि त्यांच्या कानावर ही घटना घातली. सध्या संत निरंकारी सेवादलमध्ये कार्यरत असलेल्या एका पोलीस अधिकाऱ्यावर असाच प्रसंग ओढवला होता, परंतु सर्वकाही सद्गुरुवर सोपवून त्यांनी समर्पित भावनेने सद्गुरु सेवेला वाहून घेतल्याने ते आलेल्या प्रसंगातून सुखरुपपणे बाहेर पडले असं महात्मा सकपाळजींनी दासला सांगितले. ही गोष्ट दासने ध्यानात ठेवून सद्गुरु बाबाजींवर दृढविश्वास ठेवत डिसेंबर २००९ मध्ये चेंबूर भवन येथे तसेच जानेवारी २०१० च्या महाराष्ट्र संत समागमात तन-मन-धनपूर्वक सेवा केली. **कर्ता करविता सदगुरुच असून त्यांच्या इच्छेनुसारच जे काय व्हायचे ते होईल** हाच भाव मनात बाळगला.

१० मार्च २०१० रोजी रिटपिटीशनची सुनावणी होती आणि सुनावणीचा सिरीयल नं.५४ असल्याने आज सुनावणी होणार नाही असं वाटत असतानाच ५४ ऐवजी सिरीयल नं.१० वर सुनावणी चालू झाली आणि १० मिनिटात निकालपत्र घोषित केले. आरोपीचे म्हणणे फेटाळून लावले आणि दोन एफआयआरचा मुद्दा न्यायालयाने निकाली काढला तसेच भादवि कलमामध्ये बदल करुन सदर केसला तपासणी अधिकाऱ्याने मजबूती आणल्याचा निर्णयही दिला.

समयाचे सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या कृपाशीर्वादानेच दास त्या प्रकरणातून सहीसलामत बाहेर पडला. सदगुरुवर दृढविश्वास ठेवल्याने सदगुरु पाठीराखा होऊन आपल्या भक्तांचं रक्षण कसं करतो याचा दासला अनुभव आला. कोणत्याही संकटामध्ये सदगुरुचा धावा केल्यास सदगुरु आपल्या भक्तासाठी धावत येऊन संकटाचं निवारण करतो. निराकाराचे साकाररुप सदगुरु अर्थात निराकार परमात्मा सत्याचा वाली आहे हे सदर अनुभवातून दिसून येतं.

श्री. हनुमंत बिट्ठल बोराटे
(पोलीस उप-निरीक्षक)
गोरेगाव (प), मुंबई.

प्रत्येक सेवा महान आहे

आजच्या काळात सेवा शब्द भरपूर ऐकायला मिळतो. आजच्या माणसाला माहीत आहे ती पगार देणारी सेवा. मग सरकारी असो, खाजगी असो की वैयक्तिक असो. अगदी अशिक्षित माणसं सुध्दा सेवा करुन मोबदला घेतात. मात्र मोबदला घेऊन केलेले कार्य आणि मोबदला न घेता केलेले कार्य या दोन्ही गोष्टी परस्पर विरुध्द आहेत. यालाच संतांनी, ज्ञानीजनांनी सकाम सेवा आणि निष्काम सेवा असे म्हटले आहे. सकाम सेवा मोजून मापून केली जाते. निष्काम सेवा कार्य सुंदरतेने पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून केली जाते. या ठिकाणी चर्चा करायची आहे ती निष्काम सेवा. जिला निरपेक्ष सेवा म्हटली जाते.

सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज निरंकारी मिशन मार्फत जगासमोर सुगम भक्तीमार्ग प्रस्तुत करत आहेत. या भक्तीमार्गाचा गाभा आहे ''निष्काम सेवा''. संतांना सेवा या शब्दाचा अर्थ निष्काम सेवा असाच अभिप्रेत आहे. संत तुकडोजी महाराज म्हणतात.

साधू-संते सेवा केली। अनंत हृदये संतोषविली।
व्यवहार-उपासने दाविली। सिडी मोक्ष मार्गाची।

(ग्रामगीता अध्याय ३३/८६/८७)

साधु संतांनी सेवा करुन असंख्य लोकांच्या जीवनात आनंद निर्माण केला. सुंदर व्यवहार आणि भक्तीचा सोपा मार्ग दाखविला. निष्काम सेवा हीच खरी मोक्षाप्रती पोचण्याची शिडी आहे. खरोखर सेवेचा विधी ब्रह्मप्राप्तीनंतर स्वयं सदगुरुच शिकवितो. सदगुरु बाबा गुरबचनसिंहजी महाराज नेहमी सांगत, 'निष्काम सेवा एक अशी किल्ली आहे की, सदगुरु दरबारच्या खजिन्यातील जे हवं ते आपण प्राप्त करु शकतो'.

धकाधकीच्या या मनुष्य जीवनात अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी आजचा माणूस किती व्यस्त आहे. सगळी धडपड ही धनसंपत्ती, धनधान्य भरपूर मिळावं, चरितार्थ व्यवस्थित चालावा म्हणूनच हा आटापिटा. परंतु या सर्व प्राप्तीस रामबाण उपाय बाबा अवतारसिंहजी महाराज सांगतात तो असा.

ज्या धन द्रव्य प्राप्तीसाठी मानव नित्य धावतसे।
सदगुरु सेवा करण्याने ते स्वत:च चालून येत असे।

(अवतारवाणी पद - ११३)

खरोखर अवतारवाणीतील विचार ज्याने आपल्या आचरणात आणले त्यांचे जीवन फुलत आहे, बहरत आहे. सेवेचे खरेखुरे महत्व हे सदगुरुकृपेच्या ज्ञानानेच समजते. सेवा हे एक स्वाभाविक कर्म आहे. पण ते श्रध्दा, प्रेम आणि निष्काम भावनेने प्रेरित असावे. सेवेत सौदेबाजी नसावी. सेवेमुळेच तर तन,मन,धनाच्या सर्व शक्ती प्राप्त होतात. असं म्हणतात की, सदगुरु जेव्हा दयाळू होतो तेव्हा गुरुभक्ताला सेवेची संधी देतो आणि हा स्वत:च सेवा करवूनही घेतो. म्हणून जी सेवा आपल्या वाट्याला येईल ती आपण उचलावी, ती चांगली किंवा वाईट असे वर्गीकरण करु नये किंवा श्रेष्ठ, कनिष्ठ असाही भेद करु नये.

महाभारत काळात कौरव-पांडवांच्या युध्दात पांडव विजयी झाल्यानंतर त्यांनी प्रभू श्रीकृष्णाशी चर्चा करुन राजसूय यज्ञ करण्याचे ठरविले. यज्ञाचा दिवस, वेळ निश्चित झाल्यावर युधिष्ठिरने आपल्या सर्व बंधुंना कामे वाटून दिली. कोणी कोणी काय काय काम करायचं हे निश्चित झाले. श्रीकृष्ण म्हणाले, माझ्या वाट्याला काय काम आलेले आहे? त्यावर युधिष्ठिर म्हणाले, तुमच्या कृपेनेच सर्व कार्य पार पडणार आहे तेव्हा तुम्ही आणखी कोणतंही काम करायचं नाही. तेव्हा भगवान कृष्ण म्हणाले, तुम्ही मला काम देऊ शकत नाही आणि मी कामाशिवाय थांबू शकत नाही. मग युधिष्ठिर

(पान ३० वर)

साधु जनांची सेवा करणे .....

संपूर्ण अवतार वाणी... पवित्र अवतारवाणी... संत निरंकारी मंडळाचा पायाभूत ग्रंथ. बाबा अवतारसिंहजी महाराज यांच्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे आणि एका तपाच्या काळात लेखणीतून शब्दबध्द झालेला अनमोल ग्रंथ. ज्याच्या शब्दा..शब्दातून मानवमात्राला आपल्या कर्मातून भक्ती कशी साधता येऊ शकते याचे आधी केले मग सांगितले या तत्वानुसार मार्गदर्शन केले आहे.

औषधी ना होई गुणकारी जर पथ्य पाळीले नसे।
बोले मुखाने करी न कराने कार्य सिध्दीला जात नसे।।

(सं.अ.वा. पद क्र.९)

किंवा बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी जेवूनी तृप्त कोण झाला. याप्रमाणे भक्ती शेवटास जाणार नाही. यासाठी हाताने कर्म म्हणजेच सेवा घडली पाहिजे. ही सेवा कशी करायची? कोणती सेवा महान आहे? यासंबंधी मार्गदर्शन संपूर्ण अवतारवाणी पद क्र.११३,१५१,१५४,२२६ व ३७६ मधून केले आहे.

सन्मुख सदा हरिला पाहे याहूनी उत्तम धर्म नसे।
साधुजनांची सेवा करणे याहून उत्तम कर्म नसे।
जो संतांच्या सेवेसाठी अर्पण धन संपत्ती करी।
समजावा तो निजमनीचा मळ धुऊनी साफ करी।।

(सं.अ.वा.पद क्र.१५४)

अति श्रेष्ठ तो आहे जगती
आणिक तया मिळे सन्मान।
संत जनांची सेवा करुनी
जाय मिटूनी ज्याचा मान।।

(सं.अ.वा.पद क्र.१५३)

ज्या धन द्रव्य प्राप्तीसाठी मानव नित्य धावतसे
सद्गुरु सेवा करण्याने ते स्वतःच चालूनी येत असे

(सं.अ.वा.पद क्र.११३)

तन मन धन सर्वाहूनी उत्तम सेवा ती गणली जाते
जी होई निष्काम-निरिच्छित सद्गुरुला ती आवडते

(सं.अ.वा.पद क्र.२२६)

सदगुरुला तो सेवक प्रिय पालन पाच प्रणांचे करी।
सदगुरुला तो सेवक प्रिय सेवा विनम्रतेने करी।।

(सं.अ.वा.पद क्र.३७६)

सेवा करणारेच सेवेचा आनंद घेऊ शकतात. आजवर जे जे पुण्यपुरुष झाले ते ते सेवेने महान ठरले. सेवा मालकाची करतात. सेवेमध्ये एक सेवक व एक मालक असतो. मालकाच्या हुकूमाने केलेली व मालकाला आवडलेली सेवा महान ठरते. जो मालकाचा सेवक असतो तो प्रामाणिकतेने ओतप्रोत भरलेला असतो आणि निषिध्द कर्मापासून दूर असतो. सेवा लहान किंवा मोठी नसते. सेवा ही सेवाच असते. सेवा हा आध्यात्मिकतेचा आधार आहे. सेवेमुळे सर्व प्रकारच्या दुःखांचा आपोआप नाश होतो. म्हणून तन मन धनाच्या सेवेसाठी आपण सदैव तत्पर असले पाहिजे.

'पूजा माणसाची दास्यत्व भगवंताचे.' भगवंताची सेवा मानवसेवेशिवाय होणे शक्य नाही. मानव सेवाच परमात्म्याची सेवा आहे. नर सेवा नारायण पूजा. सेवा नेहमी सामर्थ्यानुसार केली जाते. एक कवी म्हणतो,

सावलीतल्या पाषाणाला काय लावता लोणी?
माणुसकीचा देव उपाशी पाजा त्याला पाणी।
लाखात एक जाणतो आत्म्याची भाषा,
ज्याचा त्याचा डोळा झिंगे भेदाची नशा।।

संत महापुरुषांची सेवा करुनच आम्ही निराकार दातारची सेवा करु शकतो. निराकार प्रभूला स्वतःचा काही आकार नाही, ना त्याला कसल्या गोष्टीची गरज. थेट निराकाराची सेवा करण्याची कसली सोय नाही. म्हणून दैवी महापुरुषांचं सांगणं आहे की, सत्पुरुषाची सेवा करुन आम्ही प्रभूच्या सेवा कर्तव्याचा निर्वाह करु शकतो.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीता या

पुस्तकात सेवेचं महत्व वर्णन करताना म्हटले आहे,

सेवेने अंगी सामर्थ्य येते जे जे बोलाल तेच घडते।
हस्ते परहस्ते सर्व होते कार्य तयाचे।
सेवा नसावी परंपरा दांभिक आत एक बाहेर एक।
सेवा नसावी कृत्रिम सुरेख कागदी फुलापरी।
सेवा ही धनसंपत्ती खरी न सरे जन्म जन्मांतरी।

ज्याचे जगात कोणाशी वैर नाही तो तटस्थ राहून सकलांची सेवा करीत आहे. जे जे करील ते ते देवाला अर्पण करीत आहे. जो ईश्वर भक्तीने भरला आहे. क्षमावान,निःसंग, विरक्त, प्रेमळ आहे; तो परमेश्वराच्या हातातील हत्यार बनतो.

तो पुरुषोत्तम निरनिराळी सेवा साधने देऊन माझ्याकडून प्रेममुलक सेवा करुन घेत आहे. अशी दृष्टी प्राप्त झाली तर केवढा आनंद होईल. आपली प्रत्येक कृती भक्तिमय व्हावी. अहोरात्र ज्या तमाम क्रिया हातून होतील त्या भगवंताच्या पूजेनिमित्त व्हाव्यात. सर्व क्रिया करताना भगवंताची आठवण व्हावी. प्रत्येक कर्म मी माझ्या प्रभूपरमात्म्यासाठी करीत आहे. जीवनातील दैनंदिन कर्मात अशी दृष्टी यावी. शेजाऱ्याच्या रुपाने माझा नारायणच नांदतो आहे.

'झालिया दर्शन करीन मी सेवा, आणिक देवा न लगे दुजे' मग अखंड सेवाच हातून होईल. मी म्हणून कोणी नाहीच. मी माझेपण सारे पुसून जाईल. कर्मामध्ये ज्ञान आले की दगड पोखरुन दगडाचे मंदिर. दगडाचा देव दगडाचा भक्त. दगडाची फुले हे सारे एका दगडाच्या लेण्यातच. हीच अद्वैतमय सेवा. स्वामी सेवक सेवाद्रव्य एकच. ज्ञान कर्म सेवा मिळूनच तर भक्ती पूर्णत्वास येते.

परमेश्वराचे ज्ञान झाले की, प्रेम उत्पन्न होते. कर्म व भक्ती मिळून एक रमणीय रुप होते. यातून अद्‌भुत प्रेममय व ज्ञानमय सेवा सहज निर्माण होते. आईवर माझे प्रेम आहे, परंतु ते कर्मातून प्रगट झाले पाहिजे. प्रेम सदैव राबत असते व सेवेत प्रगट होते. प्रेमाचे बाह्यरुप म्हणजे सेवा. प्रेम अनंत सेवाकर्मानी नटून नाचते. प्रेम असले म्हणजे ज्ञानही येते. ज्याची सेवा करायची त्याला कोणती सेवा आवडेल याचे ज्ञान मला पाहिजे. नाहीतर सेवा ही गैरसेवा व्हायची. सेव्य वस्तूचे ज्ञान सेवकाला पाहिजे. वेद हे संस्कृतात नाहीत, संहितेत नाहीत तर ते सृष्टीत आहेत. सेवा करा म्हणजे दिसतील. सेवा करुन हात झिजले म्हणजे ब्रह्मलिखित उघडते. सेवा प्रेम व ज्ञान यावर जीवन रचायचे. जीवनाच्या प्रत्येक क्रियेत परमार्थ भरुन रहावा. प्रत्येक कर्म सेवामय प्रेममय व ज्ञानमय व्हावे. जीवनातील प्रत्येक अंग-प्रत्यांगात कर्म, भक्ती व ज्ञान भरुन रहावे हाच तो खरा पुरुषोत्तम योग. सदगुरुची कृपा आणि साधुसंतांचा आशीर्वाद असेल तरच हातून सेवा घडणार आहे.

श्री. मोहन सोपान थोरबोले
कोलाड, रायगड

(पान २८ वरुन)

म्हणाले, असं असेल तर तुम्हीच तुमच्यासाठी काम बघा. त्यावर कृष्णांनी स्वतःच आपण यज्ञात एक काम करायचे ठरवले. ते काम होते भोजनविधी पार पडल्यानंतर उष्ट्या पत्रावळी उचलण्याचे काम. यातून त्यांना एवढंच दाखवायचं होतं की, कोणतंही काम श्रेष्ठ दर्जाचेच असते, कोणतीही सेवा ही महान असते.

म्हणूनच म्हटलंय की निष्काम, निरिच्छित सेवा मनास नम्रता, विशालता, प्रेम आणि सद्‌भावना प्राप्त करुन देते. अशा सेवादार गुरुभक्तांना दातार धन-मान-इज्जत-यश आणि अमर पदवी प्राप्त करुन देतो.

दातार कृपा करो आणि सर्वांच्या जीवनात ही सेवेची गुरुकिल्ली प्राप्त होवो. सर्व गुरुभक्त अभिमान रहित होऊन कर्ताभाव त्यागून सदगुरु दरबारी सेवा, नामस्मरण, सत्संग करीत राहोत हीच सदभावना.

श्री. सिताराम कोळेकर, राजापूर-रत्नागिरी

गुरुभक्तांचा सेवा भाव

वर्तमान सदगुरु निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज जिज्ञासूंना ब्रह्मज्ञान प्रदान करुन मर्यादाशील जीवन जगण्याची कला (Art of Living) देत आहेत. परंतु हे सहजा-सहजी मिळालेले ब्रह्मज्ञान टिकवण्यासाठी मनुष्याला तीन कर्माच्या (सेवा, सत्संग व नामस्मरण) कसोटीत पारंगत व्हावे लागते. या तीन कर्माचे व्यवस्थितरित्या पालन केले नाही, तर जीवनात परमानंद प्राप्त होऊ शकत नाही. पण या तीन कर्माचा जीवनात नुसता अभिनय नको आहे, तर त्यास निस्वार्थ भावनेची गरज आहे. अभिनय किंवा देहबोली याची तालीम आम्ही कोणत्याही माध्यमातून शिकू शकतो, पण भावनेचं काय? असा प्रश्न उद्‌भवतो. कारण भाव हा अंतर्मनातून उत्पन्न होतो व अंतर्मनातून निघालेला भाव शुध्द, सात्विक, आनंददायी, निर्लेप, निष्काम असतो. त्यात कोणत्याही प्रकारचा स्वार्थ नसतो. म्हणून आमच्या प्रत्येक कर्मामध्ये तप, त्याग, प्रेम, नम्रता, श्रध्दा इत्यादी दैवी गुणांचा समावेश झाला, तर त्या कर्माला निष्काम सेवा असे संबोधण्यात येते.

आज जगात खूप काही धर्मादाय संस्था, विविध मंडळे, चॅरिटेबल ट्रस्ट, गरीब, अनाथ, वृध्द, बेवारस, रोगी यांची सेवा करण्यासाठी विविध उपक्रम या सर्वांचा जर विचार केला, तर सर्वच सेवेत अग्रेसर आहेत. सर्वांची सेवा महान आहे. या कार्यामधून सामाजिक बांधीलकी जोपासण्यात येत आहे. पण सेवा करण्याचा उद्देश जर प्रसिध्दी, प्रतिष्ठा मिळवणे असेल तर ती सेवा फलदायी होत नाही. कारण त्या सर्व कार्याच्या मागे कुठेतरी कर्ता-भाव म्हणजे सूक्ष्म अहंकार लपलेला असतो आणि तो अहंकार निष्काम सेवा करण्यापासून वंचित करतो. एकीकडे निष्काम सेवा करण्याचा भाव तर दुसरीकडे त्या सेवेपासून मेवा मिळावा अशी मनाची स्थिती निर्माण होते. कारण निष्काम सेवेचा भाव ज्यावेळी निघून जातो त्यावेळी उरतो तो फक्त अभिनय. अभिनयाने आम्ही इतरांना फसवू शकतो, पण परमेश्वराला नाही.

शबरी ही प्रभू श्रीरामचंद्रजींची भक्त होती. प्रभू श्रीरामचंद्रजी तिच्या झोपडीमध्ये दर्शन देण्यासाठी येतात, त्यावेळी ती त्यांना खाण्यासाठी बोरं देते, पण ती बोरं आंबट किंवा किडलेली असतील म्हणून एक-एक बोर चाखून देते. श्रीराम त्या उष्टया बोरांचं आनंदाने सेवन करतात. कारण देव हा भावाचा भुकेला असतो. म्हणून श्रीरामचंद्रजींना त्या उष्टया बोरांपेक्षा शबरीचा भक्ती भाव श्रेष्ठ वाटला.

सदगुरु चरणी समर्पित असलेल्या शिष्यांविषयी आम्ही ऐकले व वाचले आहे. गुरु व शिष्य यांच्या नात्यांमध्ये आकर्षण होते. सदगुरु दिवसाला रात्र व रात्रीला दिवस मानत असतील तर शिष्याच्या मनात किंतु, परंतु असे भाव उत्पन्न होत नव्हते. कारण शिष्यांचा गुरुप्रति विश्वास दृढहोता.

तन,मन,धन सर्वाहूनी उत्तम सेवा ती गणली जाते।
जी होई निष्काम निरिच्छित सदगुरुला ती आवडते।।

(सं.अ.वा.पद क्र.२२६)

जो शिष्य समर्पित व निष्काम भावनेने सदगुरुला शरण येतो तेव्हा सदगुरु त्याची जात, पात, वेशभूषा, प्रांत, भाषा, पात्रता, गुण, अवगुण न पाहता ब्रह्मज्ञान देऊन त्यास गुरुभक्ताची उपाधी देतात. जसे अवतारवाणी मध्ये लिहिले आहे.

सदगुरु आपल्या भक्तांचे मन आरशापरी स्वच्छ करी।
सदगुरु निज भक्तीचे सारे गुण अवगुण माफ करी।

(सं.अ.वा.पद क्र.१०१)

समयाचे सदगुरु निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज प्रत्येक गुरुभक्ताला आध्यात्मिक जीवन जगण्याची पवित्र शिदोरी देत आहेत. फक्त वेशभूषा व अन्य माध्यमातून कोणी गुरुभक्त बनू शकत नाही, तर आपल्याकडे असलेल्या अक्कल हुशारीला बाहेर

ठेऊन, मनाला गुरुचरणी समर्पित करुन गुरुच्या वचनावर चालावं लागते. म्हणजे मनमताचा त्याग करुन गुरुमत धारण करावं लागते. गुरुमतानुसार सेवा करणारे गुरुभक्त कोणत्याही फळाची अपेक्षा न करता परमेश्वराचे आभार मानतात. बँकेमध्ये काम करणारे रोखपाल, खजिनदार हे लाखो रुपयाची उलाढाल करत असतात. किती पैसे आले किंवा गेले तरी त्यांच्या मनात तिळमात्रही सुख दुःख नसते. त्याचप्रमाणे गुरुभक्ताचे प्रत्येक कर्म हे निःस्वार्थ व समर्पण भावनेतून होत असते. कमळाच्या फुलाप्रमाणे निर्लेप जीवन जगण्यात आनंद मिळतो. गुरुभक्त गुरुचे वचन मानतो त्यावेळी सेवाभाव अंतर्मनात आपोआप उत्पन्न होतो व निष्काम सेवेमुळे अभिमानाचा नाश होतो.

सेवा करतेवेळी जर भ्रामक कल्पना, शंका येत असतील तर ती सेवा फलदायी होत नाही. म्हणून संत तुकाराम महाराज आपल्या अभंगात लिहितात,

संत सेवेशी अंग चोरी। दृष्टी न पडो तयावरी।
संत चरणी ठेवीता भाव। आपोआप भेटे देव।
तुका म्हणे संत सेवा। माझ्या पूर्वजांचा ठेवा।।

केवळ गुरुमत हे सेवाभावी गुरुभक्ताचा अलंकार आहे. गुरुमत धारण केल्यावर अकर्ताभाव, विशालता, प्रेम, नम्रता, सत्कार, सहनशीलता, क्षमा इत्यादी गुणांनी जीवन बहरुन येते. गुरुभक्ताची विचारधारा ही सदगुरुच्या विचारधारेत विलीन होते. जो गुरुभक्त निष्काम भावनेने सेवा करतो त्यास सदगुरु सदैव प्रकाशमय बनवतात. कारण मान-अपमान, जय-पराजय, यश-अपयश, सुख-दुःख याच्या पलीकडचं जीवन गुरुभक्त जगत असतो. सदगुरु बाबाजी या संदर्भात बोलताना म्हणतात, **प्यास तो बेशक पानी से बुझती है, परंतु धन्यवाद हम पानी का नही बल्की पिलाने वाले का करते है। इसी प्रकार भक्त का धन्यवाद सदगुरु की सेवा द्वारा होता है।**

संत निरंकारी मंडळामध्ये सेवेचा भाव ठेवून संत निरंकारी सेवादलची स्थापना १९५६ साली करण्यात आली. आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे स्वयम सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी सुध्दा खाकी वर्दी परिधान केली. मगच मानवतेची सेवा करण्याचे बाळकडू सर्व गुरुभक्तांना पाजले. निरंकारी सेवादल निष्काम भावनेने कोणत्याही प्रकारचं मानधन न घेता सेवा करतात. समाजापुढे येणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींना न डगमगता सामोरे जातात.

चंदनाचे खोड स्वतः झिजून दुसऱ्यांना त्याचा आनंद देते व स्वतःचे अस्तित्व संपवते. त्याचप्रमाणे गुरुभक्त जागृत अवस्थेत राहून सेवा करतो. एक शायर आपल्या शायरीमध्ये लिहितो, 'मीटा दे अपने हस्ती को, अगर कुछ मर्तबा चाहे। कि दाना खाक मे मिलके, गुले गुलजार होता है।' जसे इंग्रजी मध्ये एक सुभाषित आहे (Action Speak loud than Words) नुसते बोल नको आहेत तर कृतीची म्हणजे कर्माची गरज आहे. कारण कर्मानेच भक्तांची ओळख होणार आहे.

एकदा दिल्ली येथे महानगर पालिकेच्या सफाई कामगारांचा बेमुदत संप पुकारण्यात आला होता. त्यामुळे निरंकारी कॉलनी मधील रोजच्या कचऱ्याचा ढीगही वाढत होता. कचऱ्याची विल्हेवाट लावणारे कामगार संपावर असल्यामुळे दुर्गंधी पसरण्यास सुरुवात झाली. एक महिला येऊन त्या ठिकाणी साफ सफाई करीत असे. पण बरेच दिवस ही साफसफाई कोण करते हे पाहण्यात आले. त्यावेळी निदर्शनास आले की, साफसफाई करणारी ती महिला नसून ते गुरुभक्त आदरणीय श्री. चाचा प्रतापसिंहजी होते. असा निष्काम सेवेचा भाव ठेवून सेवा करणाऱ्या गुरुभक्ताला सदगुरु सदैव श्रेष्ठत्व बहाल करतात.

कु. रुपेश रमेश सावंत
बोईसर, ठाणे

सेवा - सदगुरुचे एक वरदान

सदगुरु बाबाजींनी सत्संग, स्मरण आणि सेवा ही तीन कर्मे दिलेली आहेत, त्यापैकी सेवा हे कर्म आध्यात्मिकतेचा आधार आहे. सेवा ही महान आहे.सेवेचे महत्व सांगताना प.पूज्य राजमाताजी म्हणतात की, निराकार प्रभू पूर्ण आहे. त्याला कसलीच गरज नाही. प्रभूने बनविलेल्या मूर्तीला म्हणजेच मानवाला प्रत्येक गोष्टीची गरज आहे. त्याच्या गरजा यथाशक्ती पूर्ण करणं, प्रभू निराकाराची प्रसन्नता प्राप्त करण्याचं सगळ्यात सोपं साधन आहे. संत महापुरुषांच्या सेवेचा महिमा शब्दात सांगितला जाऊ शकत नाही. संत कबीर म्हणतात,

कबीर सेवा कउ हुई भले एकु संत इकु रामु।
रामु जु दातात मुक्ति को संतु जपावे नामु।।

सदगुरुच्या कृपेने आम्हाला ज्ञानाची प्राप्ती झाली त्याचे ऋण आम्ही जन्मोजन्मी फेडू शकत नाही. ज्ञानाची प्रेरणा देणारे आणि ज्ञानावर दृढ करणाऱ्या संतांची सेवा आम्हाला करायची आहे; परंतु त्याचबरोबर आपल्या कुटुंबीयांच्या व समाजाच्या उपयोगी पडले पाहिजे. महापुरुष हरमध्ये हरिचे रुप पाहतात आणि सर्वांची सेवा करुन परमपित्याची कृपा प्राप्त करतात.

सेवा करणारेच आनंदाची अनुभूती घेतात. जे सेवा करीत नाहीत, टीकाच करत राहतात ते सेवेचा आनंद घेऊ शकत नाहीत. सेवा आध्यात्मिकतेचा आधार आहे. सेवेमुळे सर्व प्रकारच्या दु:खाचा नाश होतो. म्हणून तन-मन-धनाच्या सेवेसाठी आम्ही क्षणोक्षणी तत्पर असायला हवे.

माणसाची सेवा करुन आम्ही या परमात्म्याची, या निराकाराची सेवा करु शकू हाच संदेश सदगुरु बाबाजींनी दिला. जो दुसऱ्याचे घर जाळून स्वत:च्या घरात प्रकाश करु इच्छितो, तो कधीही सुखी होऊ शकत नाही. भगवंताची सेवा मानव सेवेशिवाय शक्य नाही. नर सेवा हीच परमात्म्याची सेवा आहे. सेवा नेहमी सामर्थ्यावर केली जाते. सदगुरु वाटेल त्याच्या कडून सेवा करुन घेऊ शकतो. जसे म्हटले आहे-

अपनी सेवा आप कराये। जिस पे होय दयाला।

ज्यावेळी सदगुरु आपल्यावर खूश असतो त्यावेळी सेवा मिळत असते. सेवा हीच देवपूजा आहे. एखाद्याने उच्च कुळात जन्म घेतल्याने तो कोणी उच्च होऊ शकत नाही. प्रत्येक जण आपल्या कर्तृत्वानेच उच्च ठरतो. भक्तांच्या भक्तीचे दुसरे महत्वपूर्ण क्षेत्र म्हणजे सेवा होय. सेवा म्हणजे नोकरी नव्हे. नोकरी मध्ये नोकर वर्गाला त्याच्या मालकाकडून वेतन, पगार दिला जातो. सेवेचे तसे नाही. सेवा करणारा हा सेवक असतो. दास असतो. स्वामीची आज्ञा त्याला सर्वोपरी असते. सेवा ही निष्काम असते. सेवा ही सदगुरुच्या आज्ञेनुसार होत असते. मनमर्जीनुसार सेवा होत नाही. सेवा तनाची, मनाची, धनाची अशी तिहेरी पध्दतीने होत असते.

सेवा करीत असताना सेवकाला अलौकिक आनंद होत असतो. सेवा ही जबरदस्तीने केली जात नाही. सेवक कधीही सेवेचा अभिमान करीत नाही. जी सेवा त्याच्याकडून केली जाते तिचा कर्ता स्वत:ला मानत नाही. प्रभूकृपेने ही सेवा माझ्याकडून घडत आहे असा भाव शब्दांनी मांडता येण्यासारखा नसतो. कडक उन्हामध्ये शारीरिक कष्ट झेलत सेवा करणारा भक्त त्याच्या मुखावरील तेज आणि सेवा करण्याची संधी मिळाल्याचा आनंद त्याच्या मुखावर दिसत असतो. तो सामान्य माणसाच्या आकलन शक्तिच्या पलिकडचा असतो. डॉक्टर, वकील, इंजिनिअर, सरकारी नोकर संत समागमामध्ये वर्दी घालून स्वच्छतागृहा सारख्या ठिकाणी आपली सेवा देतो त्यात कोणताही कमीपणा न मानता सदगुरुने आपल्याला सेवेची संधी दिली आहे म्हणून आनंदाने करतो. खरे तर हा आनंद व्यक्त करण्यास शब्द अपुरे पडतात.

संपूर्ण अवतारवाणी मध्ये सेवेचा भाव प्रकट करताना शहनशाहजी म्हणतात,

तन मन धन सर्वाहूनी उत्तम सेवा ती गणली जाते।
जी होई निष्काम निरिच्छित सदगुरुला ती आवडते।

सदगुरु बाबाजी सेवेच्या बाबत बोलताना म्हणतात,

फक्त महापुरुष जी सेवा करतात ती समर्पण भावनेने करतात. कोणताही स्वार्थ न ठेवता सेवा धर्म आचरतात. सेवा सुख देते, समृध्दी देते, आनंद देते. परंतु सेवेचा अहंकार हानी पोचवतो. यासाठी भक्तीमार्गात गुरुच्या आदेशानुसार केलेल्या सेवेला महत्व आहे. गुरुच्या आदेशाचे पालन करतो, तो स्वत:ला दास मानतो. अशा भावनेने जो सेवा करतो त्याची पूजा होते. उदा. रामभक्त हनुमान, भाई कन्हैयाजी ही सेवेची अद्वितीय उदाहरणे आहेत. गुरुगोविंदसिंहजींच्या काळात भाई कन्हैया लढाई प्रसंगी जखमी झालेल्या सैनिकांना पाणी पाजत असत. आपल्या बाजूच्या जखमी सैनिकांना पाणी पाजत त्यावेळी दुसऱ्या बाजूच्या सैनिकांनाही पाणी पाजत असत. ही कृती पाहून गुरु गोविंदसिंहजी महाराजांच्या सैन्यामध्ये संतापाची लाट उसळली. भाई कन्हैयांची तक्रार गुरुदेवांकडे गेली. तेव्हा गुरुदेवांनी भाई कन्हैयांना बोलावून घेतले आणि विचारले की, तुम्ही शत्रू सैन्याला पाणी पाजत आहात असे समजले. तेव्हा कन्हैयाजींनी अगदी नम्रपणे उत्तर दिले की, गुरुजी आपण मला आत्मज्ञान दिले आहे. आपण तर अंतर्यामी आहात. आपण दिलेल्या ज्ञानामुळे मला सर्व आपलीच रुपे दिसतात. ही कन्हैयांची दृष्टी पाहून गुरुदेवांना आनंद झाला. संत तुकाराम महाराज सुध्दा सेवेचे महत्व पटवून देतात. म्हणतात,

संत-सेवेशी अंग चोरी। दृष्टी न पडो तयावरी।
संतचरणी ठेवीता भाव। आपोआप भेटे देव।
तुका म्हणे संत सेवा। माझा पूर्वजांचा ठेवा।

निरंकारी मंडळात सेवादल महत्वाचे अंग आहे. स्वेच्छेने सेवा कार्य करीत असतात. सेवा हे भक्तीचे अभिन्न अंग असून सेवा मोठ्या भाग्याने मिळते. म्हणून म्हटले जाते :-

सेवा करा हो सेवा, पुण्याईचा ठेवा।
हीच खरी देवपूजा सांगे हा सदगुरु माझा।
सेवेसारखा पुण्याईचा मार्ग नसे दुजा।।

सेवा हीच खरी पूजा आहे. सेवेमध्ये अहंकाराला मुळीच स्थान नाही. या उलट सेवा करणाराच सेवेची संधी मिळाल्याने सेवा प्रदान करणाऱ्या विभूतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. आपल्यापेक्षा निम्नस्तरातील व्यक्तीला मदत केली जाते. सेवा आपल्या ईष्टदेवतेची होते. संत महात्म्यांची होते. म्हणूनच मदत करणारा हिशोब ठेवतो. सेवा करणारा नाही. आपल्या श्रध्देयाची यथायोग्य सेवा करता आली नाही असेच सेवकाला वाटत असते. सेवा करण्यासाठी मानवाला ईश्वरस्वरुप समजणे आवश्यक आहे. जेव्हा समस्त मानव-मात्र परब्रह्म स्वरुप वाटू लागते तेव्हा त्याच्या प्रति केलेली सर्व कर्मे सेवा बनून जातात. अशा तऱ्हेने ब्रह्मज्ञानी संतांना सेवा ही जीवनात ब्रह्मरुप पाहण्याची व्यावहारिक अभिव्यक्ती होय !

कर्तव्य म्हणून परोपकार करणे ही सामाजिक बांधिलकी आहे. परंतु सेवा मात्र त्याहूनही भिन्न आहे. सेवा म्हणजे मानवाकडून दिले जाणारे एक योग्य दान आहे, ज्याचा लाभ सर्व मानवमात्रापर्यंत पोहोचतो. या योगदानाचा लाभ प्रत्येक व्यक्तीला होतो. मग ती कोणत्या जाती धर्माची आहे, हे पाहिले जात नाही. त्याला प्रत्येक रुप प्रभूचे रुप वाटत असते.

मनुष्याचे जीवन सेवेनेच प्रफुल्लित होते. सेवेने जीवनात आनंद प्राप्त होतो. महापुरुषांसाठी सेवा आवश्यक आहे. तन-मन-धन यापैकी कोणती सेवा महान आहे असा विचार केला तर सेवेमध्ये लहान मोठा भेदभाव नसतो. सेवा वेळेवर आवश्यकतेनुसार असावी. सेवा निष्काम भावनेने केलेली असावी. सेवा निष्काम सेवा कशी असू शकेल तर सेवा निष्काम तेव्हा असू शकेल जर ती मालकाच्या हुकूमाने केलेली असेल. जेव्हा सेवा गुरुच्या आदेशाने केलेली असेल तेव्हा महान सेवा असू शकते. मग ती सेवा कोणतीही असो, तनाची-मनाची-धनाची.

आपण हीच प्रार्थना करायची की, हे प्रभू-दातार! अशी कृपा कर की आमच्याकडून अशीच सेवा घडू दे जी आमच्या मालकाने, सदगुरुने सांगितली आहे. सदगुरुच्या इच्छेनुसार आमच्याकडून सेवा घडत राहो ही शक्ती दे.

श्री. युवराज ज्ञानोबा सुर्यवंशी
खानापूर, सांगली

सेवा... सदगुरुचे भक्तासाठी एक वरदान

सेवा मे कमी, सत्कार मे कमी।
दातार हर कमी, बख्श लो।

जेव्हा १९४७ साली भारताची फाळणी झाली तेव्हा देशाच्या विभाजनानंतर बरेच महापुरुष भारतात आले. रहायला घर नव्हते. नेसायला वस्त्र नव्हते. रिफ्यूजी कॅम्पमध्ये बऱ्याच जणांना काही काळ रहावं लागलं. त्यावेळी शहनशहा बाबा अवतारसिंहजींनी आपल्या भक्तांना सुखी करण्यासाठी एक आदेश दिला की, आपल्या कष्टाच्या कमाईतून प्रत्येक कुटुंबाने एक रुपया प्रतिसदस्य, प्रतिमहिना बिल्डिंग फंडाच्या रुपाने भरावा. अशा प्रकारे दातार कृपा करेल आणि आपल्या सेवेला रंग येईल. लवकरच तुम्ही आपापल्या घरात राहू लागाल. आपलं कार्यही चालू राहील, तिथे प्रभू यश गात प्रत्येकाला सुख प्राप्त होईल.

सदगुरुचे हे वचन गुरुभक्तांनी विश्वासाने मानले आणि त्याप्रमाणे काही काळातच ईश्वराच्या कृपेने त्यांची स्वत:ची घरे तयार झाली. जसं म्हटले आहे,

देश काल समया पाहूनी मार्गी ज्या गुरु चालविती
गुरु आज्ञेचे पालन करुनी सेवक त्या मार्गे जाती

(सं.अ.वा. पद २२६)

सदगुरु बाबा गुरबचनसिंहजी म्हणतात, 'सेवा ही अशी एक किल्ली आहे की, जिच्याद्वारे तुम्ही सदगुरुच्या भरपूर खजिन्यातून जे पाहिजे ते घेऊ शकता.' तसं पहायला गेलं तर आपण तनाने सेवा करणे हे सुध्दा आपल्यासाठी फार आनंददायी सेवा ठरते. यासाठी सदगुरु शारीरिक चिकित्सा शिबीर, रक्तदान शिबीर, नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत तर काही वेळा स्वच्छता अभियान या द्वारे आपल्याकडून तनाची सुध्दा सेवा करुन घेतो. जसे अवतारवाणी मध्ये म्हटले आहे,

तोच करी साधुची सेवा ज्या करवी करवीतो हा।
अवतार तोच गुण गाईल याचे मुखी जयाच्या वदवील हा।।

तनाची सेवा करण्यासाठी ५ जून २००९ साली बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी स्वत: मसुरी येथे स्वच्छता अभियानात भाग घेतला. आपण या धरतीला प्रदूषणापासून मुक्त करावे, सर्व प्राणिमात्रांची सेवा करावी या उद्देशाने पर्यावरण दिन साजरा करुन सर्व जनतेलाही निरंकारी मिशनची ओळख करुन दिली. जसे राजमाताजीही आपल्या विचारात सांगतात, **जो दौड दौड के सत्संग करते है, उन्हे दावा लेने की जरुरत नही पडती।** म्हणजे जेव्हा आपण ह्या तनाने स्वत: सत्संग मध्ये जातो त्यावेळेस आपली शारीरिक दु:खेही दूर होतात आणि मनही निर्मळ-पावन होते. जेव्हा सर्व संत महात्मे एकत्र येऊन सेवा करतात तेव्हा एकमेकांना भेटून कार्य करण्याची भावना वाढीस लागते.

सेवा ही आपल्या मनाला विशालता, प्रेम, नम्रता, माधुर्य आणि सदभावना प्रदान करते. जेव्हा संत मिळून-मिसळून सेवा करु लागतात तेव्हा संतांच्या सहवासाने आपल्यामध्ये सहयोग करणे, त्याग करणे अशा पवित्र भावना मनामध्ये रुजू लागतात आणि आपले मन संतांच्या आशीर्वादाला पात्र ठरते.

युगपुरुष शहनशहा बाबा अवतारसिंहजीच्या काळातील ही गोष्ट आहे. निरंकारी कॉलनीची स्थापना झालेली होती. तेथे जवळच एका ओसाड आणि नापीक जमिनीवर सरोवर निर्माण करण्याचं काम सुरु झालं. एके दिवशी सायंकाळी शहनशाहजी आपल्या काही भक्तांसमवेत त्या ठिकाणी फेरफटका मारत होते. चालता-चालता त्यांच्या मनात विचार आला की, जर या ठिकाणी एखादा महापुरुष रहायला आला तर किती बरे होईल. हे कार्य अधिक चांगल्याप्रकारे होईल. गुरुचा हा इशारा मिळताच महात्मा संतोखसिंहजी यांनी (त्यावेळी निरंकारी मंडळाचे सदस्य होते) तेथे

परिवारासह राहण्याचा निश्चय केला आणि सरोवर कार्यात आपलं मोलाचं योगदान दिलं. आज हे सरोवर त्यांच्याच नावाने म्हणजे निरंकारी संतोख सरोवर या नावाने ओळखले जाते. कारण त्यांनी कोणत्याही गोष्टीचा विचार न करता, क्षणाचाही विलंब न करता त्या ठिकाणी परिवारासह राहून मनोभावे सेवा केली हे अगदी खरंच आहे. जे भक्त निष्काम, निरिच्छित भावनेने सेवेच्या संधीचा लाभ घेतात त्यांचंच नाव या निरंकारी मिशनच्या इतिहासात अजरामर झाले आहे. जसे अवतारवाणी मध्ये म्हटले आहे,

मान प्रतिष्ठेसाठी ज्या तू उत्तम कर्मा आचरिशी।
संत जनांची सेवा करीता क्षणी सर्व ते मिळवीशी।
केली जरी तू लाख औषधे नाही मिटणे रोग तुझा।
नाम औषधी घेशील जेव्हा मिटेल सारा भोग तुझा।
सर्व धनाहून आहे मोठा केवळ नामाचा खजिना।
म्हणे अवतार तयाला मिळतो वंदन करी जो गुरुचरणा।

(सं.अ.वा.)

असेच एकेदिवशी श्रीगुरुनानक देवजी महाराज जनकल्याणासाठी फिरत-फिरत एका गावी गेले. रात्र झाली म्हणून त्या गावात ते विश्रांतीसाठी थांबले. त्यावेळेस समोर त्यांना एका पारावर दोन-तीन माणसे बसलेली दिसली. नानकदेवजींनी त्यांना विचारले, भाऊ आजची रात्र इथं मुक्काम करु म्हणतोय, तेव्हा इथं कुठे राहण्याची सोय होईल का? पारावर बसलेली माणसं काही सज्जन नव्हती. टवाळखोर होती. फजिती करावी म्हणून त्यांनी लांबूनच एका झोपडीकडे बोट दाखवित म्हटले, समोर ते घर आहे ना तिथे एक सज्जन राहतात त्या ठिकाणी आपण विश्रांती करा. ते तुमची राहण्याची-भोजनाची व्यवस्था करतील.

त्या व्यक्तींनी सांगितल्याप्रमाणे नानकदेवजी त्या दिशेने चालू लागले. त्या घरासमोर गेले तर ते घर मोडकळीस आलेले, अर्धवट भिंती पडलेल्या अशाप्रकारे होते. घरात एक मिणमिणता दिवा पेटलेला होता आणि दरवाजा अर्धवट उघडाच होता.नानकदेवजींनी दरवाजावर टकटक असा आवाज केला. आपल्या हातात दिवा घेऊन त्या घरातील व्यक्तीने दरवाजा उघडला. आपल्या दारात एक उंच, धिप्पाड तेजस्वी पुरुषाला पाहून त्या व्यक्तीने विचारले, आपण कोणीतरी सिध्दपुरुष दिसत आहात. माझ्याकडे तुमचे काय काम आहे? नानकदेवजींनी त्या व्यक्तीकडे पाहिले, तर त्या व्यक्तीच्या अंगावर जखमा झाल्या होत्या. हातापायाची बोटं झडून गेली होती. गावाने आणि कुटुंबाने वाळीत टाकलेला तो कुष्ठरोगी होता.

नानकदेवजी त्यांना म्हणाले, दादा आजची रात्र मी या गावात थांबेन म्हणतोय. मला विश्रांतीसाठी थोडी जागा मिळेल का? ती व्यक्ती म्हणाली, महाराज मी कुष्ठरोगी आहे. माझा स्पर्श होऊ नये म्हणून माझ्याजवळ कोणीही येत नाही. माझ्याशी कोणी बोलतही नाही. तुम्ही इथे कसे काय रहाल? या प्रश्नावर नानकदेवजी म्हणाले, तुमची इच्छा असेल तर मी इथेच राहिन. त्या रात्री नानकदेवजींनी त्या कुष्ठरोग्याच्या घरी भाजी-भाकरी खाल्ली आणि प्रभू चर्चा करीत झोपी गेले. दुसऱ्या दिवशी पहाटे लवकर उठून त्यांनी कुष्ठरोग्याला स्वतः आंघोळ घातली. त्याच्या जखमा स्वच्छ धुऊन त्याच्यावर झाडपाल्याचे औषध लावले. काही दिवस ते त्या कुष्ठरोग्याकडे राहिले आणि त्याची मनोभावे सेवा केली. थोड्याच दिवसात कुष्ठरोगी व्यक्तीत बराच फरक पडला. तो तनाने सुदृढ झालाच पण संत सहवासात राहून ईश्वरीय ज्ञानानेही ते समृध्द झाला. हे सर्व पाहून गावकऱ्यांनाही नवल वाटले ते गुरु नानकदेवजींपुढे नतमस्तक झाले.

एके ठिकाणी म्हटले आहे,

रंजल्या गांजल्यां जीवांची। मनी धरी खंत।।
तोचि खरा साधू। तोचि खरा संत।।

मीराताई श्रावण चव्हाण, पुणे

सेवेने चारित्र्यमय जीवन बनते

ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात।
साधूची संगती तरणोपाय।।

(हरिपाठ)

सेवा हे एक भक्तीचे अंग आहे. संतांची संगत व सदगुरुची सेवा केली, तर आपला उध्दार होईल. याशिवाय तरणोपाय नाही. द्रौपदीने श्रीकृष्ण भगवंताच्या बोटाला चिंधी बांधली. त्याचे फळ वस्त्रहरणच्या वेळी भगवंताने येऊन तिचे रक्षण केले. एकनाथ महाराजांनी गाढवाला पाणी पाजले, अस्पृश्य मुलाला कडेवर ऊचलून घेतले. त्यांनी कोणताही भेदभाव न केल्यामुळे देवाने संत एकनाथांच्या घरी पाणी भरण्याची सेवा केली. सुदामाच्या बायकोने मूठभर पोह्याची सेवा केली. भगवंताने त्याचे दारिद्र्य नाहिसे केले.

बागेत फुले अनेक असतात, शोभिवंत दिसतात. पण सर्वच फुले सुगंध देतात का? कारण मनुष्याला फुकट देह मिळाला आहे, याची त्याला आठवण नाही. म्हणून प्रेमाचा भाव वाटत नाही. सेवा-परोपकार उत्पन्न होत नाही. त्याची जाणीव कलियुगात सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज देवाची ओळख करुन देत आहेत. याची समज येण्यासाठी तीन कर्मे करण्यास सांगत आहेत. सत्संग, सेवा, नामस्मरण. या कर्माने मनुष्याला आपल्या मूळस्वरुपाची समज येते. तोच सदगुरुची सेवा करण्यास योग्य ठरतो. दास चिपळूण संभाजीनगरमध्ये राहतो. सोसायटीच्या मध्यभागी एक कुत्रा मरुन पडला होता. त्याची भरपूर दुर्गंधी येत होती. दासने तो उचलून दफन केला व जागा झाडून स्वच्छ केली. सोसायटीचे लोक मला गाडगेबाबा म्हणू लागले. दासला एका शिक्षकाने विचारले, हे तुम्हाला कसे शक्य झाले? दासने सांगितले, ही सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांची कृपा आहे. त्यांच्याच आशीर्वादाने ही सेवा घडते. जसे गाडगे महाराजांनी सांगितले, माणसात देव बघा. पण निरंकारी बाबा माणसामधला देव दाखवीत आहेत, त्यांचे अज्ञान दूर करुन निर्गुण परमात्म्याची अनुभूती करुन मनुष्याचा भ्रम दूर करत आहेत. सर्वांना पोसणारा व जळीस्थळी भरुन राहिलेला निराकार परमात्मा आहे. हा मुंगीला कणभर देतो व हत्तीला मणभर देतो, हीच गोष्ट मनुष्य विसरला आहे. 'ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी।।'

ज्याने आईच्या उदरात नऊ महिने अन्न पुरविले त्याची सेवा करण्यास मनुष्य विसरला आहे. सेवेने देवाला आपलासा करता येतो. भक्त पुंडलीक आई-वडिलांच्या सेवेत मग्न होते. पांडुरंग प्रत्यक्ष भेटण्यासाठी गेले. त्याची सेवा पाहून विठ्ठल प्रसन्न झाले व म्हणाले, माझ्या नावाच्या अगोदर तुझे नाव घेतले जाईल. म्हणून आज विठ्ठलाच्या अगोदर पुंडलिकावरदे हरी विठ्ठल असा जयघोष होतो.

'ज्याचं खावं मीठ, त्याचं काम करावं नीट।' तरच आमचं जन्ममरणाचं रहाटगाडगं चुकेल.

काय सांगशी यम दरबारी वही तुझी आहे कोरी।
म्हणे अवतार ऐक मानवा व्यर्थ भार वाहशी शिरी।।

(सं.अ.वा.पद क्र.१६०)

मनुष्य आपले अवयव आरशात पाहतो. शरीर नीटनेटके आहे का हे पाहतो, पण सदगुरुने ज्ञानरुपी आरसा दिलेला असून स्वतःला आरशात पाहण्याचे टाळतो. म्हणून निर्मळ भाव निर्माण होत नाही. ज्याप्रमाणे पाण्याच्या टाकीत जसे पाणी असेल तसेच नळाला येईल. एकदा बाबाजींनी उदाहरण दिले की, एका विहिरीत मेलेला कुत्रा पडलेला होता. पाणी स्वच्छ करा असा आदेश आला, पण झाले उलटे. पाणी स्वच्छ केले; पण कुत्र्याला मात्र बाहेर काढलं नाही. मनुष्याची अशाप्रकारे अवस्था बनली आहे. सदगुरुचे वचन काय आहे, हेच जर कळले नाही तर मनामध्ये परिवर्तन होईल कसे?

सेवा करताना पूर्ण समर्पित व निष्काम असावी. त्यात दिखावा नसावा. एक मुलगी सोनाराकडे जाते व दागिन्याची किंमत विचारते. एक हार बाराशेचा तर एक

(पान ३९ वर)

सेवा - सदगुरुचं एक वरदान

मानवाच्या जीवनामध्ये आनंदाची आणि भाग्यशाली वेळ म्हणजे पूर्ण सद्गुरु भेटणे आणि सदगुरुद्वारा परमात्म्याचे ज्ञान होणे यासारखा परमानंद नाही. म्हणून मानवाने कुठल्याही कर्मकांडात न अडकता पूर्ण सदगुरु चरणी आपल्या जीवनाचे कल्याण करुन घ्यावे.

आजच्या समयाचे सदगुरु निरंकारी बाबा हरदेवसिंहजी महाराज जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत मानव कल्याणासाठी जातात. बाबाजींच्या असीम कृपेने अनेकांना दिव्य असा ब्रह्मज्ञानाचा प्रसाद मिळून त्यांचे संसार सुखी होत आहेत. समृध्द होत आहेत. जेव्हा माणसाला सत्य आणि सर्वव्यापी असलेल्या निर्गुण-निराकार परमेश्वराचे ज्ञान प्राप्त होते त्यामुळे तो सर्व प्रकारच्या कर्मकांडातून पूर्णपणे मुक्त होतो तेव्हाच तो सुख-स्वरुप होऊन एकाच ईश्वरावर पूर्ण विश्वास ठेवतो. सेवा आणि स्मरण हे एकाच परमेश्वराला जाणून करतो. सदगुरु कृपेने त्याला सेवेची गुरुकिल्लीच प्राप्त होते.

सदगुरु बाबा गुरबचनसिंहजी महाराज नेहमी सांगत, सेवा ही एक अशी किल्ली आहे की भक्त सदगुरुच्या दरबारातील खजिन्यातून हवं ते प्राप्त करु शकतो. आपल्याला सदगुरु ब्रह्मज्ञान देतात आणि महत्वाची तीन कर्म करायला सांगतात. त्यापैकी सेवा एक कर्म आहे. मानवाचे जीवन ऊन आणि पावसाच्या खेळाप्रमाणे सुख दुःखाने भरलेले आहे. जीवनात कधी सुखाचे तर कधी दुःखाचे क्षण वाट्याला येतात. जीवन हे एक खडतर आहे असे एका कवीने म्हटले आहे, "दोन दिवस दुःखात गेले, दोन दिवस वाट पाहण्यात गेले. मोजतो आहे आता, डोईवरती राहिलेत किती उन्हाळे ? शेकडो वेळा चंद्र आला. तारे फुलले, रात्र धुंद झाली, पण भाकरीचा चंद्र शोधण्यातच सारी जिंदगी बरबाद झाली."

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा मिळविण्यासाठी माणूस किती व्यस्त आहे ! ही धावाधाव कशासाठी तर घर-संपत्ती-धन-धान्य अमाप मिळावे. आपले जीवन चरितार्थ योग्य असाच चालावा यासाठी हा आटापिटा, परंतु या सर्व गोष्टी प्राप्त करण्यासाठी एकमेव रामबाण उपाय आहे तो असा की,

ज्या धन द्रव्य प्राप्तीसाठी मानव नित्य धावतसे।
सदगुरु सेवा करण्याने स्वतःच चालूनी येत असे।
ज्या सुख शोधासाठी मित्रा सदैव तू धडपड करीशी।
सर्व सुखांची होईल प्राप्ती जडता प्रीती संतांशी।
मान प्रतिष्ठेसाठी ज्या तू उत्तम कर्मा आचरिशी।
संत जनांची सेवा करीत क्षणी सर्व ते मिळवीशी।

(सं.अ.वा.पद क्र.११३)

अवतारवाणीतील वरील शब्द प्रत्यक्ष आचरणात आणल्यामुळे महात्म्यांचे जीवन बहरत आहे, यात तिळमात्र शंका नाही. सेवेचे महत्व फक्त सदगुरु कृपेच्या ज्ञानानेच समजते. सेवा एक स्वाभाविक कर्म आहे. सेवा ही जर, तर किंवा सौदेबाजी नसावी, तर सेवा ही श्रध्दा-प्रेम आणि निष्काम भावनेने प्रेरीत असावी. सेवा केल्यानेच मानवाला तन-मन-धनाच्या सर्व शक्ती प्राप्त होतात. सदगुरुची जेव्हा कृपा होते तेव्हा गुरुभक्ताला सेवेची संधी मिळते. तसे पाहता जो सदगुरुला पूर्णपणे समर्पित होतो, मग तो जगातील कुठल्याही मायाजालमध्ये फसत नाही. त्याच्यातील कर्तेपणा निघून जातो आणि निष्काम भावनेने सेवेत तो सेवारत होतो. फळाची अपेक्षा करत नाही. म्हणूनच अशा गुरुभक्ताबद्दल म्हटलय -

सेवा करत होई निहकामी
तिस करु होत परापति सुआमी।।

ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर स्वयं सदगुरु सेवा करण्याची विधी शिकवितात.

अपनी सेवा आप करावे जित ते होय दयाला।

सदगुरु ज्याच्यावर कृपावंत होतात त्याला सेवा देतात आणि स्वत:च सेवा करवूनही घेतात.

भक्त हा कर्ताभाव त्यागून गुरुच्या दरबारात निरंतर सेवा करत असतो. ही सेवेची गुरुकिल्ली घेऊन गुरुभक्त आयुष्यभर तन-मन-धनाच्या सर्व शक्ती प्राप्त करतो. सदगुरुही निष्काम सेवा करणाऱ्या गुरुभक्तांवर कृपादृष्टी करुन त्याचं जीवन सुखमय करुन टाकतात. सेवा ही निरिच्छित व निष्काम अशी केल्यास मनाला विशालता-प्रेम-नम्रता आणि सदभावना प्राप्त करुन देते. अशा सेवादार भक्तांना हा दातार मान-धन-यश आणि अमरत्व प्रदान करतो. अशा सेवादार ब्रह्मज्ञानियांचे घर पृथ्वीवरील सर्वोत्कृष्ट मंदिर बनून जाते.

आपण शेतात बीज पेरतो तेव्हा बीजाची छोटी पिशवी असते. पण जेव्हा पीक भराला आल्यावर ते धान्य छोट्या पिशवीने नाही तर मोठ्या पोत्यातून घेतो. त्याचप्रमाणे सदगुरु चरणावर देखील काया-वाचा-मनाने समर्पित होऊन भरभरुन सेवा करावी, कारण गुरु ही धर्माची शेती आहे. त्यामुळे सेवेचं बीज पेरताना हयगय करु नये, कारण म्हटलंय की,

गुरु धर्माची शेती-बीज पेरुनी घ्याहो।
जीवनवेली येईल बहरुन, अनुभव तरी पहा हो।
सदगुरु-कृपेने होईल, रंकाचाही राजा।
सांगे हा सदगुरु माझा- हीच खरी गुरुपूजा।।

सदगुरुच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सेवेची ही गुरुकिल्ली प्राप्त होवो. सर्व गुरुभक्त अभिमान रहित होऊन कर्ताभाव त्यागून निष्काम रुपाने सदगुर दरबारी सेवा, सत्संग आणि नामस्मरण करीत राहोत हीच सदभावना.

श्री. शंकरराव आवडाप्पा बारसे (सर)
अहमदनगर

गुरुपूजा

आला आला पावन, दिवस अतिपावन आला,
सद्गुरुचरणी लीन होऊनी, वंदन करुया चला ।।धृ।।

आनंदी आनंदी मन, बहरुन आले जणू उपवन,
उपवनातील सुंदर-सुंदर, फुले चरणी करु अर्पण
प्रेम, नम्रता, सहनशीलता, आदर सन्मानाची
सुगंधीत या भाव फुलांची, कंठी घालूया माला ।।१।।

उपवनातील या फुलांनी, करुया यांची पूजा,
पूजा हीच खरी सद्गुरुची, ना मानू भेदभाव दुजा
आचरुनी सद्गुरु वचनाना जीवन घडवूया
जाण ठेऊनी सत्कर्माची जागू कर्तव्याला ।।२।।

गुरुपूजा ही सीमित नाही एका दिवसासाठी
अंतरी असावी मूर्त तूझी नाम सदैव ओठी
सुख शांती नांदावी जगती द्यावे हे वरदान
'सोनाली' मंगलमय व्हावे मागणे मागते तुला ।।३।।

सोनाली चव्हाण, सातारा

(पान ३७ वरुन)

हार बारा हजाराचा होता. तेव्हा मुलगी विचारते, दिसायला दोन्ही सारखेच; पण किंमत वेगळी का? तेव्हा सोनार सांगतो, हा बाराशेचा हार आहे. त्यात वरुन सोन्याचे पाणी आहे, पण आतमध्ये पितळ आहे. बारा हजाराच्या हारात मात्र आतमध्ये सोने व बाहेरुनही सोने आहे. तसेच आपण आतून व बाहेरुन एकरस राहून सेवा करु या.
'देव माझा मी देवाचा'. हाच भाव कायमचा राहील हीच सदगुरु चरणी प्रार्थना!

श्री. शंकर सखाराम घाणेकर
तुरळ, रत्नागिरी

सेवा... श्रध्दा, प्रेम, नम्रतेने व्हावी

सेवा एक ईश्वरीय कर्म आहे जे सद्‌गुरुच्या कृपाशीर्वादाने प्राप्त होते. कुणाला मदत करणे याला सेवा म्हणत नाही. जसे गरीब व अनाथांची सेवा करणे किंवा पशू, पक्षी जनावरे यांची सेवा ही सेवा होत नाही. जसे आपण संसारात पाहतो, मदतीमध्ये उपकाराचा अहंकार असतो. याठिकाणी सेवेमध्ये सेवा करणाऱ्याची मानसिक स्थितीही समर्पित भावनेने असते. सेवा करणारा हा सेवा समर्पित करणाऱ्यास आपल्या पेक्षा उच्च स्थानी मानतो. अशा सेवेचा पात्र तोच होऊ शकतो ज्यावर सद्‌गुरुची कृपा आहे.

सेवेच्या पाठीमागे एक तर्क असतो. आम्ही ज्यांची सेवा करतो त्यापासून आम्हास काय प्राप्त होते. ज्याप्रमाणे अध्यात्मवादात मुक्तीला श्रेष्ठ मानले जाते. जो सद्‌गुरु आम्हाला मुक्ती देऊ शकतो तोच या सेवेला पात्र आहे. जो मुक्ती देऊ शकत नाही तो उलट हानीकारक होऊ शकतो.

मुक्ती म्हणजे जन्म मरणाच्या चकरामधून मुक्त होणे होय. बाबा अवतारसिंहजी म्हणतात, मुक्तीचा अर्थ मनुष्य जन्मात ज्या कामासाठी आलास ते काम पूर्ण केले. ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर जीव निराकार परमेश्वराला मानतो आणि सद्‌गुरुच्या हुकूमाप्रमाणे आपले जीवन बनवतो त्याला मुक्ती नक्कीच मिळते.

सेवा ही निष्काम भावनेने केली जाते. काही स्वार्थापोटी किंवा भौतिक व सांसारिक सुख मिळविण्यासाठी केलेला सौदा नसतो. सेवा करणे प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे, यामध्ये कोणतीही मजबूरी नाही. सेवेत कोणत्याच प्रकारचा दिखावा नसतो. दिखावा असल्यास त्यात अभिमान वाढतो. सेवा तर प्रेम, नम्रता निर्माण करण्यासाठी आहे. सेवा आणि भक्ती दोघेही एकत्र राहतात. सेवेमुळे समर्पित भाव निर्माण होतो. त्यामुळे भक्ती पूर्ण होते. सेवेमध्ये आम्ही ज्यांची सेवा करतो त्यांच्या गुणांना प्राप्त करतो आणि ही एक शारीरिक व मानसिक अवस्था आहे की, सेवा करणारा व सेवा करवून घेणारा दोन्ही एकच होऊन जातात.

सेवा श्रध्दा व प्रेमपूर्वक भावनेने निर्माण होते. मनात श्रध्दा, प्रेम आणि विश्वास नसेल तर सेवा होऊच शकत नाही. सेवा नेहमी आपल्यापेक्षा मोठ्याची केली जाते. परंतु मनात जर हा गरीब व मी श्रीमंत असा भाव ठेवून सेवा करत असेल तर ती सेवा न होता एक प्रकारे उपकार होईल, यात उपकाराचा अहंभाव निर्माण होईल, यातून अभिमान प्रकट होईल. दया, भावना मनात ठेवून कुणाला केलेली मदत ही कदापि सेवा होऊ शकणार नाही. सेवा करताना मनामध्ये हाच भाव पाहिजे की, हा माझ्या सेवेचा मोहताज नाही. याला काहीही कमी नाही हे तर माझे सौभाग्य आहे. मला यांची सेवा करण्याची सुवर्ण संधी मिळाली . माझ्यावर त्यांचे उपकार आहेत की, माझी सेवा त्यांनी स्वीकारली. अशा भावनेने केलेली सेवाच सुखदायी ठरते. अशा प्रकारचे भाव सद्‌गुरु अथवा संत महात्मा यांच्या प्रतिच बनू शकतात.

आध्यात्मिक जीवनात प्राणिमात्राची सेवा करताना अशा प्रकारचे भाव तेव्हाच शक्य आहे जेव्हा सर्वच सद्‌गुरुचे रुप दृष्टीस येऊ लागते. प्रत्येक घटामध्ये ईश्वराचे रुप दिसून येईल. हे केवळ सद्‌गुरु कृपेने शक्य आहे. सहज सेवा करणे इतके सोपे नाही. आपल्या अभिमानाला त्यागून, लहान बनून, मनात आदर-सत्कार भाव ठेवूनच सेवा केली जाऊ शकते. सेवा कमविण्यासाठी जिवंतपणेच मरावे लागते. अनुशासनामध्ये राहून गुरुमताप्रमाणे केलेली सेवा हीच खरी सेवा होत असते. जसे संतवाणीत लिहिले आहे -

सेवक को सेवा बनिआई, हुकूम बुझ परमगतिपाई।

समयानुसार जसे आदेश येतील त्याप्रमाणे सेवा करण्याचे काम हे सेवकाचे असते. जेव्हा शिष्य हा सद्‌गुरुलाच सर्वकाही समजतो त्यावेळी सेवा ही आपोआप घडत जाते. कारण सेवा करण्याचा कितीही निश्चय केला, वेगवेगळ्या योजना बनविल्या तरीही सेवा ही सद्‌गुरु कृपेनेच होत असते. अशी वेळ आपोआप येते. त्यावेळी मनात श्रध्दा, विश्वास, प्रेम व त्याग भावनेने सेवा सद्‌गुरु व संताची होते.

तनाने परिश्रम करुन, धनाने भेट स्वरुपात, मनाने-मानत कुठलीही लालसा न ठेवता केलेली सेवा ही वास्तविक सेवा होते. संत महात्मा सांगत असतात, सेवेच्या फळांची इच्छा न करता केलेली सेवा ही खरी सेवा होय.

सेवा ही श्रध्दा, प्रेम, नम्रतेने झाली तरच सद्‌गुरु कृपा होऊन मानव जीवन धन्य होईल.

श्री. सुनिल द. नांदोडे जालना

गुरदासपूर (पंजाब)
येथे आयोजित विशाल
सत्संग समारोहाचे
भावपूर्ण दृश्य

द्वारिका (दिल्ली) येथे
निरंकारी प्रदर्शनीचे
सेवादार निरंकारी
राजमाताजींकडून
आशीर्वादाची कामना
करताना

सद्गुरु बाबाजी व
मातृशक्तींच्या
पावन छत्रछायेत
राजकवी गुरबख्शसिंहजींच्या
(इनसेट) श्रद्धांजली
समारोहात (अमृतसर)
उपस्थित साधसंगत व
परिवार

RNI No. 59874/93
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai - 400 001.
on dated 8th of every month

Printed matter
Postal Regd. No. MH/MR/EAST/91/2009-2011
W.P.P. Licence No. MR/TECH/WPP-53/EAST/2009-2011

नववर्ष समागमात साधसंगतला दर्शन देताना सद्गुरु बाबाजी, निरंकारी राजमाताजी व पूज्य माताजी

जम्मू येथील आयोजित संत समागमातील विशाल जनसमूह

मेंढर येथे सद्गुरु बाबाजी व पूज्य माताजींचे हार्दिक स्वागत करताना स्थानिक धार्मिक श्रद्धाळू